# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ प्रकरण पहिले - | नारायण सुमंतपूर्व कृषिजन विषयक कविता - | १ ते २९ |
| २ प्रकरण दुसरे - | नारायण सुमंत यांच्या कवितांची आशयसूत्रे - | ३० ते ८५ |
| ३ प्रकरण तिसरे - | नारायण सुमंत यांच्या कवितेतील आकृतिबंध, अविष्कार तंत्र, भाषा व शैली | ८६ ते १०५ |
| ४ प्रकरण चौथे - | समकालीन कविता आणि नारायण सुमंतांची कविता | १०६ ते १३८ |
| ५ प्रकरण पाचवे - | उपसंहार | १३९ ते १५१ |
| ६ परिशिष्ट 'अ' - | संदर्भ ग्रंथ सूची | १५२ |
| ७ परिशिष्ट 'ब' - | संदर्भ काव्य संग्रह सूची | १५३ |
| ८ परिशिष्ट 'क' - | संदर्भ नियतकालिके सूची | १५४ |

# प्रकरण - पहिले
# नारायण सुमंतपूर्व कृषिजन विषयक कविता

इ.स.१९८० नंतरच्या काळात मराठी कवितेत नारायण सुमंत यांची कविता महत्वाची मानली जाते. प्रस्तुत प्रबंधात नारायण सुमंत यांच्या *रानभैरी, वृक्षवेद, सातबारा* या कवितासंग्रहांच्या आधारे त्यांच्या कविता लेखनाचा विचार करावयाचा आहे.

नारायण सुमंत यांच्या कवितांची काही वैशिष्ट्ये सकृतदर्शनी जाणवतात. त्यांच्या कवितेत निसर्ग कविता आणि वास्तववादी कविता यांचा सुरेख संगम झाला आहे. निसर्ग कवितांमध्ये वृक्षांवर त्यांनी मोठ्या प्रमाणात कविता लिहिल्या आहेत. वृक्षांचे स्वरूप, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे मोठेपण, त्यांची वृत्ती व मानवी जीवनाशी वृक्षांचे असणारे नाते इ. वृक्षांसंबंधी अनेक महत्वाच्या बाबींवर प्रकाश टाकताना कवी दिसतो. वृक्षांशी इतक्या मोठ्या प्रमाणात तादात्म्य पावलेला कवी मराठीत दुसरा नाही. याशिवाय ते वास्तववादी कवीही आहेत. शेतक-यांचे दु:ख, त्यांच्या समस्या, त्यांच्यावर होणारा अन्याय कवी आपल्या कवितांतून वेशीवर टांगतो. नारायण सुमंत यांच्या कवितांतून लोकसंस्कृतीच्या, ग्रामसंस्कृतीच्या खुणाही सापडतात. ग्रामीण बोलीचा वापरही आपल्या कवितांमधून नारायण सुमंत करतात. प्रतिमांचा सढळ वापरही नारायण सुमंत करतात. या सर्व प्रथम दर्शनी जाणवणा-या वैशिष्ट्यांमुळे नारायण सुमंत यांच्या कवितांचा सखोल वेध घेणे गरजेचे वाटते.

नारायण सुमंत यांच्या कवितेचा विचार करण्यापूर्वी मराठीतील कृषिजन विषयक कवितांचा विचार करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील लोकांची जीवनपद्धती ही कृषिप्रधान आहे. येथे मोठ्या प्रमाणात शेती करणा-या लोकांचा वर्ग आहे. हा वर्ग प्रामुख्याने खेडेगावातच वास्तव्य करून राहतो. खेडेगावातील मानव समूह जीवन जगताना दिसतो.

गावातील लोकांच्या काही परंपरा असतात. प्रत्येक गावाची परंपरा ही भिन्न असते. एखाद्या देवाची किंवा देवीची यात्रा परंपरेने भरविली जाते. वेगवेगळ्या गावात वेगवेगळ्या प्रकारचे सण परंपरेने साजरे केले जातात. *जोगण्या* नावाच्या एका सणाची परंपरा काही गावातच साजरी केली जाते. वेगवेगळी रुपे धारण केलेली, हातात निरनिराळी शस्त्रे घेतलेल्या लोकांची गावभर मिरवणूक निघते. ही परंपरा काहीच गावात दिसते. अशा अनेक परंपरा, रुढी प्रत्येक गावात असतात. परंपरेनेच अनेक पिके लोक घेताना दिसतात.

गावातील लोक श्रद्धामय जीवनही जगताना दिसतात. प्रत्येक गावात असा एखादा तरी देव किंवा देवी असते ज्याच्यावर संपूर्ण गावाची श्रद्धा असते, या देवाला *ग्रामदैवत* असे म्हटले जाते. या देवाशिवाय इतरही देव असतात. त्यांच्यावरही अनेक लोकांची श्रद्धा असते. नाग, बैल, काही वृक्षांवरही लोकांची श्रद्धा असते. लोक अनेक महत्वाची कार्ये चांगला दिवस पाहून करतात. गावात भविष्य पाहणारे किंवा धार्मिक विधी करणारे काही लोक असतात. तसेच, विविध रोगांवर उपचार करणारेही लोक असतात. या सर्व लोकांवर अनेकांची श्रद्धा असते. अशा परंपरा, श्रद्धा, रुढी, जीवन संकेत मिळून एक ग्रामसंस्कृती बनत असते. मूलभूत मानवी प्रकृतीनुसार ही संस्कृती तयार झालेली असते. म्हणून ही संस्कृती गेली हजारो वर्षे टिकून आहे. याबद्दल आनंद यादव म्हणतात, 'मूलभूत मानवी प्रकृती समजल्याशिवाय संस्कृती निर्माण करणे धोक्याचे असते. प्रकृती समजून न घेता संस्कृती निर्माण केलीच तर ती टिकत नाही. तिला विकृतीचे स्वरूप प्राप्त होते. संस्कृतीचा हा आत्मा भारतीय संस्कृतीने फार पूर्वीपासून समजून घेतलेला दिसतो. त्यामुळेच भारतीय संस्कृती जगातील इतर संस्कृतींपेक्षा अधिक चिरस्थायी स्वरुपाची झाल्याचे दिसते.' [१]

या ग्रामसंस्कृतीचे प्रतिबिंब आधुनिक मराठी साहित्यात पडलेले दिसते. कारण, आधुनिक साहित्य हे बहुजनांचे साहित्य आहे. बहुजन समाजाचे मन, बहुजनसमाजाची दु:खे, बहुजनसमाजाच्या इच्छा, आकांक्षा, भावभावना आधुनिक साहित्यात व्यक्त होतात असे वा.ल.कुलकर्णी म्हणतात[२] ते खरेच आहे. हे ग्रामीण साहित्याकडे पाहिल्यावर पटते. ग्रामीण साहित्यात गेली कित्येक वर्षे शेती-शेतकरी जीवन विषयक कविता व गद्य वाङमय लिहिले जाते. त्या कवितेला कृषिजनविषयक कविता किंवा ग्रामीण कविता असे म्हणतात.

ग्रामीण साहित्याचा सविस्तर विचार करताना हे लक्षात येते की, ग्रामीण जीवनातील स्त्री, पुरुष, त्यांची सुख-दु:खे, आशा-आकांक्षा तसेच शेती, शेतक-यांचे प्रश्न, यांचा विचार सखोलपणे, वस्तुनिष्ठपणे ज्या साहित्यात किंवा कवितेत केला असेल ते ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कविता होय. ग्रामिणतेबद्दल आनंद यादव म्हणतात '*खेडेगाव*, तेथील जीवनपद्धती, तेथील अशा खास रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवीपण, प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली, काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञान विषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या इ. गोष्टींची अनुभूती या साहित्यात होते.'[३] यादवांची ही संकल्पना पाहिली की, त्यांनी अनेक गोष्टींचा समावेश या संकल्पनेत केला आहे. या प्रत्येक

गोष्टीला स्पर्श करणे प्रत्येक ग्रामीण साहित्याला अशक्य असले तरी, या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात पडलेले दिसते. थोडक्यात, असे म्हणता येईल की, ग्रामीण जीवनाचे परिपूर्ण चित्रण ज्या साहित्यात घडते ते ग्रामीण साहित्य होय.

या ग्रामीण साहित्यातही शेतीला केंद्रीभूत घटक मानून काही काव्य लिहिले गेले. तिला कृषिजन विषयक कविता म्हणता येईल. याचीही पूर्वपरंपरा मोठी आहे. काहीजण भा.रा.तांबे यांच्या *गुराख्याचे गाणे* कवितेपासून तर काहीजण चंद्रशेखर यांच्या *काय हो चमत्कार* या खंड काव्यापासून याची सुरुवात झाली असे म्हणतात. पण या सर्वांचे एका महान विभूतीकडे दुर्लक्ष होताना दिसते. ती विभूती म्हणजे महात्मा जोतीबा फुले हे होत. शेतकरी, त्यांचे प्रश्न, त्यांची वस्तुस्थिती यांच्याविषयी त्यांची जाण अत्यंत प्रगल्भ होती. त्यांनी आपल्या समाज कार्याबरोबर साहित्य निर्मितीही केली. आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे महात्मा फुले हे आद्य प्रवर्तक होते. हिंदू समाजातील शुद्रातिशुद्रांच्या व्यथा त्यांनी नि:शंकपणे बोलून दाखविल्या. कर्जबाजारीपणामुळे, हैराण झालेल्या शेतक-यांची गा-हाणी त्यांनी वेशीवर टांगली. महात्मा फुलेंच्या पूर्वी महाराष्ट्रात अनेक समाज सुधारक होऊन गेले. परंतु, शेतक-यांच्या समस्या व त्यांची स्थिती, गतीबद्दल एवढ्या सखोलपणे विचार कोणीही केला नव्हता. खरे तर संपूर्ण आपल्या समाजव्यवस्थेचा महत्वाचा घटक म्हणून शेतकरी मानला जातो. असे असूनही या शेतक-याकडे दुर्लक्ष झाले होते. महात्मा फुल्यांच्या पूर्वी विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी एकच निबंध शेतक-यांविषयी लिहिला होता.[४] महात्मा फुलेंनी मात्र शेतकरी, त्यांची दु:खे, त्यांच्या समस्या यावर सखोलपणे विचार आपल्या कवितेत केला. शेतक-यांचा *आसूड, अखंड* अशा काही लेखनाद्वारे त्यांनी शेतक-यांचे दु:ख सर्वांसमोर आणले. *शेतक-याचा आसूड* बद्दल नागनाथ कोतापल्ले म्हणतात 'खरे म्हणजे महात्मा फुले यांचे एकूण लेखनच मुळी शेतकरी-कष्टकरी यांचा आक्रोश शब्दांकित करणारे आहे.' *शेतक-याचा आसूड* मध्ये ते अधिक धारदार, अधिक स्फोटक, अधिक टोकदार आणि विस्तारीत स्वरुपात आहे. यादृष्टीने *शेतक-याचा आसूड* हा ग्रंथ एकूण महात्मा फुले यांच्या वाङ्मयसंभारात मोलाचा ठरावा.'[५] शेतक-यांना समाजातील अनेक घटक त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कसे नाडतात याचे चित्रण त्यांच्या कवितेत दिसते. शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. कारण त्यांच्या मालामध्ये कमीशन उपटणारे लोकच सत्तेवर आहेत. शेतकरी कसा दारिद्र्यात, अज्ञानात बुडलेला आहे हे सांगताना महात्मा फुले म्हणतात -

*काय पुरती लंगोटी। फिरती नांगराचे पाठी*
*एका घोंगड्यावाचोनी। स्त्रिया नाही दुजे शयनी*
*ढोरामागे सर्वकाल। पोरे फिरती रानोमाळ*
*ताक कण्या पोटभरी। धन्य म्हणे तो संसारी*[६]

शूद्र शेतकरी दीनवाण्या स्थितीस पोहोचण्याची कारणमीमांसा त्यांनी आपल्या काव्यात केली आहे. दारिद्रयात जीवन कंठणा-या शेतक-याला शेतसारा भरण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. कर्जरोखे लिहिणारा भट या अज्ञानी, अडाणी किंवा अशिक्षित शेतक-यांचा गैरफायदा घेतो. त्याला लिहिता, वाचता येत नाही. म्हणून खोट्या नोंदी केल्या जातात. ज्यामुळे, त्याची न्यायालयातही दाद लागत नाही. महात्मा फुले यांनी मांडलेले हे शेतक-यांचे दु:ख प्रथमच मराठी कवितेतून आले आहे. म्हणूनच मराठी ग्रामीण साहित्याच्या जनकत्वाच्या संदर्भाने महात्मा फुले यांच्या साहित्याचा विचार केला तर असे दिसून येते की, मराठी जीवनाचा सर्वार्थाने गाभा असलेल्या शेतक-यांच्या, पददलितांच्या, ग्रामीणांच्या सुख-दु:खात्मक जीवनाचे चित्रण त्यांच्या साहित्यात दिसते. संपूर्ण मराठी समाजात या ग्रामीण जीवनाचे स्थान काय आहे, त्याचा आणि उच्च वर्णियांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक संबंध काय आहे याचा विचार त्यांच्या साहित्यात दिसतो. या सर्व बाबींचा विचार केला असता ख-या अर्थाने ग्रामीण जीवनाचे चित्रण महात्मा फुले यांच्या साहित्यात दिसून येते म्हणून त्यांना पहिले ग्रामीण साहित्यिक मानले पाहिजे.

याच काळात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमध्ये काम करणा-या काही समाजसेवकांनी सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी काही रचना केली. ही रचना त्यांनी जलशाद्वारे सर्वसामान्य कष्टकरी व शेतकरी लोकांच्यापर्यंत पोहोचविली. हे लिखाण करणा-यांमध्ये कृष्णराव भालेराव, मुकुंदराव पाटील आदींचा समावेश आहे. हे सर्व लिखाण शेतक-यांच्यावर होणा-या अन्यायाचे दर्शन घडविणारे आहे. शेतक-यांच्या स्थितीचे वास्तववादी दर्शनही या लिखाणातून घडते. श्री.मुकुंदराव पाटील यांच्या *कुलकर्णी लीलामृत* (इ.स.१९१२) या काव्य ग्रंथामध्ये कुलकर्ण्यांपासून गरीब शेतक-यांना कसा त्रास होतो याचे वर्णन केले आहे. अर्थात या सर्व लेखकांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

या नंतरच्या काळात हे शेतक-यांच्या विषयक लिखाण खंडीत झाले आहे. त्यानंतर आधुनिक मराठी कविता लिहिली गेली. केशवसुत यांच्या कवितेत निसर्गाचे चित्रण येऊ लागले. त्यांच्यापुढे बालकवींनी तर मोठ्या प्रमाणात निसर्गचित्रण आपल्या कवितेत केले. हे निसर्ग चित्रण करीत असताना खेड्याचे, शेतीचेही वर्णन आहे. परंतु, तरीही त्यांनी कृषीजन कविता लिहिली असे म्हणता येणार नाही. कारण, त्यांच्या कवितेत वर्णनापुरतेच ग्रामीण जीवन आहे. ही परंपरा पुढे बा.भ.बोरकर, इंदिरा संतांपर्यंत चालू राहिली, परंतु ती कविता सर्वस्वी वेगळी आहे म्हणून तिचा विचार करणे येथे अप्रस्तुत आहे.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये जानपद कविता म्हणून लोकप्रिय झालेली कविता इ.स.१९२० नंतरच्या काळात अवतरली. याला काही वाङ्मयीन कारणे होती. तशी राजकीय व सामाजिक कारणे होती. महात्मा गांधींच्या कार्यामुळे सर्व जनतेचे लक्ष ग्रामीण भागाकडे वळले. त्याचबरोबर, खेड्यातील काही तरुण शिक्षित झाले होते त्याचाही परिणाम यांवर झाला. आणखीन एक महत्वाची गोष्ट घडली ती म्हणजे इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावाने (पॅस्टोरल पोएट्री) मराठी मध्ये ही जानपद कविता निर्माण होऊ लागली. केशवसुत व त्यांचेच कार्य पुढे चालविणा-या कवींचे कार्य इ.स.१९२० च्या आसपास संपुष्टात आले. त्याच दरम्यान *रविकिरण* मंडळाची स्थापना झाली. या मंडळातील अनेक कवींनी इंग्रजी काव्याच्या प्रभावाने जानपद कविता लिहिण्यास सुरुवात केली. अर्थात या सर्व कवींचे अनुभवक्षेत्र वेगळे होते. ते सर्वजण अपवाद वगळता शहरामध्ये वाढलेले होते. त्यामुळे, त्यांनी जी कविता लिहिली, ती त्यांच्या अनुभवक्षेत्रापेक्षा वेगळी होती. याबद्दल, गो.म.कुलकर्णी म्हणतात,'आपले ग्रामीण साहित्य बहुजनसमाजाच्या स्फूर्तीतून जन्माला आलेले नसून ती एक पांढरपेशांनी, पांढरपेशांकरिता निर्माण केलेली टूम आहे. तिचा निर्माता आणि भोक्ताही मुख्यत: हाच वर्ग आहे. मराठी ललित साहित्यात ग्रामजीवन लोकप्रिय झाले ते आधुनिक कवींच्या *जानपद* कवितांमार्फत. या आधुनिक कवींनी ग्रामजीवनाची किंवा तेथील निसर्गाची भेट थेटपणे न घेता, ती इंग्रजीतील Pastoral Poetry च्या माध्यमातून घेतली. ही वस्तूस्थिती बोलकी आहे. केशवसुतांसारख्या कवीलाही जे खेडे भावते, ते वास्तवातले नसतेच. ते खेडे म्हणजेच केशवसुतांच्या कल्पनारम्य वृत्तीचे प्रतीक ठरते. दीर्घकालपर्यंत ग्रामीण जीवनाकडे एका सांकेतिक भूमिकेतून दूरस्थपणे पाहिले गेले. मनोरंजनाचा किंवा स्वप्नरंजनाचा एक आकर्षक विषय हीच दृष्टी येथे प्रबळ राहिली.'[७]

भा.रा.तांबे यांनी *गुराख्याचे गाणे* ही कविता मे,१९०७ साली लिहिली. या कवितेतील गुराखी निसर्गामध्ये आनंद उपभोगणारा आहे. त्याला ऊन, वारा, पाऊस या कशाचीही भिती नाही. त्याला जरी



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कांदा आणि भाकरी खायला मिळत असली तरी, त्यात त्याला आनंद वाटतो. तो आनंदाने पावा वाजवत द-याखो-यात फिरत आहे. या कवितेत भा.रा.तांबे यांनी गुराख्याचे वर्णन कल्पनारम्य पद्धतीने केले आहे. प्रत्यक्ष गुराख्याचे जीवन व या कवितेतील गुराख्याचे जीवन यामध्ये फार अंतर आहे. याच पद्धतीने त्यांची दुसरी कविता दुष्काळानंतरचा सुकाळ. या कवितेतही दुष्काळापेक्षा कवीला त्यानंतरचा सुकाळच फार आकर्षित करतो. तांबे सौंदर्यवादी कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा तो दृष्टीकोनही या कवितेत दिसून येतो. ख-या अर्थाने ग्रामीण कविता म्हणून या कवितांकडे पाहता येत नाही.

याच काळात काव्यलेखन करणारे कवी चंद्रशेखर यांनी ग्रामीण जीवनावर खंड काव्यही लिहिले. त्यांचे पहिले खंड काव्य *काय हो चमत्कार!* (१९११) याचा उल्लेख ग्रामीण साहित्याच्या इतिहासात नेहमी केला जातो. अर्थात हे काव्य मिल्टनच्या *सपाक मिरॅकल* या खंड काव्यावरून रुपांतरीत केले आहे. परंतु, हे रुपांतर करताना कवीने मराठी साज यशस्वीरीत्या चढविला आहे. परंतु, तरीही या काव्यात कल्पनारम्यता फार आहे. मुळात हे प्रेमकाव्य आहे. त्यामुळे, कल्पनारम्यतेला फार वाव आहे त्यानुसार, कवीने या काव्यात कल्पना रम्यता आणली आहे. ग्रामीण बोलीच्या विचारानुसार कवीने शब्दांचे रुप तसेच देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे, ते शब्द विचित्र झाले आहेत. चंद्रशेखरांची पुढील दोन खंडकाव्ये *किस्मतपुरचा जमीनदार* व *उगडं गुपित* ही काव्ये ग्रामीण जीवनावर आधारीत आहेत. ही काव्ये मात्र रुपांतरीत नाहीत. या दोनही काव्यांत पुन्हा कल्पनारम्यता आली आहे. एकूणच चंद्रशेखर कवीची वृत्ती कल्पना रम्यतेकडे झुकणारी दिसते. त्यांनी या खंडकाव्याशिवाय काही स्फुट कविताही ग्रामीण जीवनावर लिहिली. त्यामध्ये, *काळ तर मोठा कठीण आला* या कवितेचा समावेश होतो. कवीचंद्रशेखर जानपद कविता लिहिण्याच्या हेतूने हे लेखन करताना दिसत नाहीत.

*सुगी* हा जानपद कवितांचा पहिला प्रातिनिधिक संग्रह इ.स.१९३३ मध्ये प्रसिद्ध झाला व ख-या अर्थाने जानपद कविता लोकांसमोर आली. या संग्रहात तत्कालीन अनेक कवींच्या कविता आहेत. या संग्रहाचे संपादन ग.ल.ठोकळ यांनी केले आहे. संग्रहात संपादित केलेल्या कविता पूर्वीच लिहिलेल्या होत्या. पण त्या जानपद कवितांना प्रातिनिधिक रुप ग.ल.ठोकळ यांनी दिले. या संग्रहातील अनेक कवींनी आपल्या कवितांमध्ये खेडे, शेती यांचे वर्णन केले आहे. परंतु, या सर्वांचेच ग्रामीण जीवनाचे अनुभव थिटे असल्याने त्यांच्या कवितांच्यामध्ये अनेक गफलती आढळतात. ग.ह.पाटलांचा अपवाद वगळता प्रत्येकाकडे हे अनुभव नव्हते. त्यामुळे, त्यांच्या काव्यात अनेक चुका झालेल्या आहेत. अनेक कवींनी ग्रामीण भाषा लिहिण्याच्या नादात भाषेची बरीच मोडतोड केलेली आहे. ग्रामीण जीवनाचे खोलवर चित्रण या संग्रहातील

कोणत्याच कवितांमध्ये आढळत नाहीत. प्रामुख्याने खेडे, शेती यांच्या वरवरच्या वर्णनातच रमणारी ही कविता आहे. तरीही, काही कवींनी केलेले वर्णन सुसंगत व वास्तववादी आहे. उदा. कवी सुरेश यांच्या चारच कविता या संग्रहात आहेत. परंतु, त्यामध्ये शेतक-यांच्या अवस्थांची व शेतांची वर्णने वास्तवपूर्ण आहेत. या संग्रहात पुढे आणखीन जानपद काव्य लिहिणारे अनेक कवींचे काव्यलेखन आलेले दिसते. त्यामध्ये, पां.श्रा.गोरे, ग.ह.पाटील, ग.ल.ठोकळ आणि के.नारखेडे यांचा समावेश आहे. याचबरोबर, चंद्रशेखर यांचे एक खंडकाव्य (उगडं गुपित) ही या संग्रहात आहेत. या सर्व कवींबरोबर ना.घ.देशपांडे, साधुदास, म.श्री.पंडित, गिरीश, वि.भि.कोलते, वि.म.धुले, सोपानदेव चौधरी यांच्याही कविता या संग्रहात आहेत. त्या काळात असा जानपद कवितांवर संग्रह निघाला हीच कौतुकाची बाब आहे. या संग्रहाचा गौरव करताना आनंद यादव म्हणतात,'ग्रामीण कविता शक्य आहे एवढेच या कवितेने जाणवून दिले. त्यामुळे, त्यातील कवींपेक्षा तिचे संपादन करून प्रकाशन करावे एवढी ती महत्वाची आहे. असे वाटणा-या ग.ल. ठोकळ यांना त्याचे अधिक श्रेय द्यावे लागते'[८].

ग्रामीण साहित्याच्या इतिहासाच्या दृष्टीने या काव्यसंग्रहास ऐतिहासिक महत्व आहे असे कैलास सार्वेकरांना वाटते[९]. हा ग्रामीण किंवा जानपद कवितांचा पहिला संग्रह होता. यानंतर या संग्रहावर अनेकांनी चर्चा केली. त्यावरूनही, यां संग्रहाचे महत्व दिसून येते. त्याचप्रमाणे, हा संग्रह पुढे बी.ए.च्या अभ्यासक्रमातही लावल्याची नोंद इतिहासात सापडते. या सर्व गोष्टींवरून सुगी या काव्य संग्रहाचे महत्व कळून येते. हा काव्य संग्रह ग्रामीण वा जानपद काव्यसंग्रहाचा आदर्श संग्रह नसला तरी येथून पुढे ग्रामीण कवितेला उधाण आले. त्याला कारणीभूत हा कवितासंग्रह ठरला, म्हणजेच ग्रामीण कवितेला या संग्रहाने एक वाट निर्माण करून दिली. हे त्या काव्य संग्रहाचे महत्व लक्षात घेतले पाहिजे.

*सुगी*मध्ये ज्यांच्या कविता समाविष्ट करण्यात आल्या होत्या त्या कवींनी पुढेही आपले काव्य लेखन चालू ठेवले. त्यामध्ये, पांडुरंग श्रावण गोरे यांचा उल्लेख महत्वाचा ठरतो. त्यांच्या *बोबडे बोल* हा काव्य संग्रह १९३२ साली प्रसिद्ध झाला. या कविता संग्रहामध्ये कविता थोडयाच होत्या तरीही, त्या वास्तववादी होत्या. तत्कालीन ग्रामीण कवितांची एकूण स्थिती पाहता त्या कविता अत्यंत वेगळ्या स्वरुपाच्या होत्या. या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील दारिद्रय, दु:ख, परावलंबित्व यांचे गडद चित्रण झाले आहे. त्यांनी या कविता लिहित असताना नागर भाषेचाच वापर केला. परंतु, तरीही त्या कविता अस्सल ग्रामीण वाटतात. कारण त्यातील आशयच ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. त्यांच्या *हृदगत, शेतक-याचे गाणे, भारेवाली*

अशा काही कविता पाहिल्या की, त्या कवितांमध्ये वास्तववादी चित्रण दिसून येते. उदा. *भारेवाली* या कवितेत भारेवाली स्त्रीचे वास्तवपूर्ण चित्रण करून ते तिच्या दारिद्र्याचे दर्शन *घडविताना म्हणतात.*

*हा भारा रोज विकावा*
*मग त्यावरी गुजर करावा*
*कळणा कधि कोंडा खावा*
*गोजिरवाणे लहानसे परिरावे*
*ते कसे तरी पचरववे*[१०]

या काव्यातील इतर कवींच्याकडे पाहिले असता ते ग्रामीण जीवनाकडे पाहून आनंदून जातात. त्यामध्ये त्यांना सुख दिसते, संपन्नता दिसते. मात्र गोरे ग्रामीण जीवनातील दु:खानेच अधिक व्याकूळ होतात. म्हणूनच त्यांच्या ग्रामीण जीवनातील दु:खाचे चित्रण करणा-या कविता परिणामकारक ठरल्या आहेत. त्यांचे त्यानंतरही वाणीचा *हुरडा* व *बोरकूट* हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. या मध्येही प्रेम - शृंगार विषयक कविता असल्यातरी, ग्रामीण कविताही आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनातील अनेक व्यक्तिरेखांचे (ज्या ग्रामीण जीवनात नेहमी आढळतात अशा उदा.भारेवाली, गुराखी, शेतकरी इ.) जिवंतपणे आपल्या कवितेमध्ये शब्दबद्ध केल्या. ग्रामीण जीवनाचे खोलवर ज्ञान व अनुभव त्यांना असल्याशिवाय हे शक्य नव्हते. ते एका गरीब शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला आले होते हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पूर्वीच्या ग्रामीण कवींच्या तुलनेत त्यांची कविता वेगळी होती हे लक्षात घेण्यासाठी त्यांची *गुराख्याचे गाणे* या कवितेची तुलना भा.रा. तांबे यांच्या *गुराख्याचे गाणे* (मे,१९०७) या कवितेशी करता येईल. भा.रा.तांबे यांचा गुराखी आनंदाने पावा फुंकीत रानातून, द-याखो-यातून मौज करताना दिसतो. त्याला ऊन,पाऊस,थंडी याचा कशाचाही त्रास होत नाही. तो दु:खी दरिद्री नसून उलट समाधानी व सुखी असाच दाखवला आहे. मात्र याच आशयाची कविता लिहिताना गोरे म्हणतात -

*मग उठून गुंडाळोनी गोधडी*
*करिकाठी तशी उचलोनी - घोंगडी*
*ना ऊन पाहता पाणी - वा झडी*
*ओलांडूनी पांधण शिवेपलिकडे रानी*
*चाराया नेतो गाई हिरव्या कुरणी*[११]

असे त्याच्या कष्टमय जीवनाचे वर्णन करतात. फक्त ग्रामीण जीवनातील व्यक्तिरेखाच ते चित्रित करताना दिसत नाहीत तर ग्रामीण जीवनातील अनेक भावभावनांची चित्रणे ते करतात. उदा. *पोळ्याच्या दिवशी* या कवितेत एक नुकतीच विधवा झालेली स्त्री आपला बैल मिरवायला आज पती जिवंत नाही म्हणून दु:ख करताना आढळते. तर, *दिवाळी* या कवितेत दुष्काळातील एका गरीब कुटुंबाच्या दारिद्र्याच्या स्थितीचे वर्णन करताना कवी वर्णन करतो की, त्या शेतक-याकडे एक चवलीही नाही. मुलाबाळांना कपडेलत्ते नाहीत तसेच, खायला अन्नही नाही याचे वर्णन करताना कवी म्हणतो -

*बाळ समोरे बसली । सण आज दिवाळी ।*

*घरी बंद आज चूल*

*विझला दिवा न तेल*

*ही गर्द रात काळी । सण आज हा दिवाळी*[१२]

अशाच प्रकारे *बलिदान* या कवितेत पावसाअभावी पिकांची, जनावरांची, पक्ष्यांची आणि मानवजातीची झालेली दैना कवी चित्रित करताना दिसतो. तर, *वणवा* या कवितेतही दुष्काळामुळे गाव सोडणा-या शेतक-याच्या दु:खद स्थितीचे चित्रण कवी करतो. पां.श्रा.गोरे यांच्या या कविता पाहिल्या म्हणजे त्यांच्या काही कवितांचा अपवाद वगळता त्यांनी ग्रामीण जीवनातील शेतकरी, कष्टकरी लोकांच्या जीवनातील दारिद्र्य, दु:ख आणि त्यांचे ढोर कष्ट चित्रित केलेले दिसतात. हे चित्रण करत असतांना खोट्या कळवळ्याने चित्रण ते करताना दिसत नाहीत. तर त्यांना या ग्रामीण जीवनातील सर्व लोकांच्याबद्दल आस्था व जिव्हाळा असलेला दिसून येतो. या कवीची स्तुती करताना आनंद यादव म्हणतात 'त्यांच्या ग्रामीण कवितांचे विशेष महत्व आहे. संख्येने कमी असल्या तरी त्या तात्कालीन इतर कोणत्याही ग्रामीण कवितेपेक्षा अधिक वस्तुस्थिती निदर्शक आहेत. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य आणि असहायता हा त्यांच्या सर्वच ग्रामीण कवितांचा स्थायीभाव आहे. भाषा ग्रामीण नसली तरी, अधून मधून ग्रामीण शब्द येतात. या भाषेचे वैशिष्टय असे की, तिचा सूर (रिंग) ग्रामीण आहे.'[१३] या कवीकडे पुढे अनेक समीक्षकांचे दुर्लक्षही झालेले दिसते. याला कारण म्हणजे त्याच काळात रविकिरण मंडळातील अनेक कवींनी जानपद कविता लिहिली त्याच कवितेकडे समीक्षकांचे लक्ष वेधले गेले. कारण ही मंडळी लोकप्रिय होती. त्यामुळे, साहजिकच गोरे दुर्लक्षित राहिले. परंतु, आनंद यादव, राजन गवस यांच्या सारखे समीक्षक गोरेंच्या कवितेचे मोल जाणून आहेत म्हणूनच राजन गवस गोरे यांच्या कवितेचे मोल जाणून गोरे यांना महात्मा फुले, बहिणाबाई चौधरी, महानोर यांच्या पंक्तीत नेऊन बसवितात.[१४]

याच काळात कवी गिरीश यांनीही *आंबराई* हे खंडकाव्य ग्रामीण जीवनावरच लिहिले. मुरार या श्रीमंत शेतक-याच्या जाया/याची जीवन कहाणी यात चित्रित झाली आहे. त्याच्या उघळपट्टीने येणारे दारिद्रय व पुन्हा कष्टाने प्राप्त होणारे वैभव यांचे चित्रण या खंडकाव्यात झाले आहे. अर्थात या काव्यातही कल्पनारम्यता फार आहे. शेती, शेती व्यवसाय यांचे गोडवे गायले आहेत. त्याचप्रमाणे मुरारच्या जीवनात सुखानंतर दारिद्रय येते व पुन्हा त्याला वैभव प्राप्त होते हे सर्व योगायोग सर्वसामान्य शेतक-याच्या वाट्याला येतात का? हा विचार केला तर अनेक शेतकरी पिढ्यान पिढ्या दारिद्रयात खितपत पडलेले आपल्याला दिसून येतात. अर्थात असे असले तरी, अंबराईत ग्रामीण जीवनातील चालीरिती, परंपरा, उत्सव यांचे दर्शन घडते. कवी चंद्रशेखरांच्या पुढे गिरीशांनी पाऊल टाकलेले दिसते. कारण चंद्रशेखर यांच्या खंडकाव्यात परावलंबित्व आहे. मात्र आंबराई मात्र स्वनिर्मित आहे. तरीही, यामध्ये काव्य किती होते हा प्रश्न आहे. याबद्दल वा.ल.कुलकर्णी म्हणतात - 'रविकिरण मंडळाच्या काळात मराठीत बरीच *कथाकाव्ये* लिहिली गेली. त्यांना खंडकाव्या या नावाने संबोधण्यात आले. या खंडकाव्याच्या लेखनाचे उद्दिष्ट काय होते? हे उद्दिष्ट मूलत: कथाकथनाचे होते आणि शक्यतो हे कथाकथन *काव्यात्म* होईल अशा प्रकारे करण्याचे होते असेच म्हणावे लागेल.'[१५]

गिरीशांनी काही कविताही स्फुट स्वरुपात केली. अर्थात त्यामध्ये *रम्य ते खेडे* हाच भाव प्रकट झाला आहे. अनेक योगायोगाने शेतकरी जीवन सुखी होताना दिसते. गिरीशांप्रमाणे रविकिरण मंडळातील आणखी एक कवी यशवंत यांनीही ग्रामीण जीवनावर काव्यलेखन केलेले दिसून येते. *नांगरखुटी, शेतकीतील सुख, न्याहरीचे गाणे, झाल्या तिन्हीसांजा* इ. काही कवितांचा समावेश होतो. *नांगरखुटी* या कवितेत इतर कवींनी शेतक-याच्या वैभवाचे वर्णन पाहून कवी यशवंत प्रत्यक्ष आम्हांला दिसलेले शेतक-यांचे जीवन हे खडतर आहे. त्याला कर्ज फेडण्यासाठी बैल विकावे लागतात असे वर्णन ते करतात. शेतकीतील सुख कविता मात्र *नांगरखुटी* तील वास्तवापासून दूर गेलेली दिसते. शेतक-याचे जीवन कसे सुखी आहे हे चित्रित करताना ते दिसतात. ज्याप्रमाणे कवी गिरीशांच्या काव्यात शेतकरी सुखाबद्दल आकर्षण दिसते त्याचप्रमाणे कवी यशवंत यांच्या कवितेतूनही दिसून येते. *न्याहारीचे गाणे* हे कवी यशवंताचे गाणे प्रसिद्ध झाले होते. पतीला न्याहारी घेऊन जाताना एका शेतक-याची पत्नी आपल्या बरोबरीच्या स्त्रियांना - सख्यांना भरभर चालण्याची सूचना करते. या कवितेत पतीच्या बद्दलचे भावही व्यक्त झाले आहेत. मात्र नांगरखुटी *च्या* वेळेपर्यंत व सूर्य डोक्यावर आला तरीही ही स्त्री न्याहारी घेऊन चालली आहे. या वर्णनावरून या कवितेत औचित्यभंग झाला आहे. कारण शेतकरी सकाळी सूर्य उगवायच्या वेळी न्याहारी करतो हे येथे

लक्षात घेणे आवश्यक आहे. *झाल्या तिन्ही सांजा* या कवितेत पतीला उशीर झाला म्हणून काळजी करणा-या स्त्रिचे वर्णन आले आहे. या कवितेतही रात्रीचे वर्णन कवीने केले आहे मात्र कवितेला शिर्षक मात्र *झाल्या तिन्ही सांजा* असे दिले आहे. अशा काही कविता कवी गिरीश व यशवंतांच्या आहेत. त्यांच्या कवितेत अपवाद वगळता सर्वत्र ग्रामीण जीवनाबद्दल सुखमय चित्रण दिसून येते. तसेच, अनेक ठिकाणी ग्रामीण जीवनातील अपु-या ज्ञानामुळे तपशिलात चुकाही झालेल्या आढळतात. हे दोन्ही कवी रविकिरण मंडळातील महत्वाचे कवी म्हणून गणले जातात. ते या ग्रामीण जीवनावर कविता लिहू लागले हे त्यांचे विशेष म्हणावे लागेल. या सर्व सुगीतील कवींनी व त्या काळात काव्यलेखन केलेल्या सर्वच कवींची दृष्टी ग्रामीण जीवनाकडे एक रुचीपालट म्हणूनच गेलेली दिसते. याला फक्त अपवाद पां.श्रा.गोरे यांचा.

बी.रघुनाथ हेही त्या काळात काव्यलेखन करणारे कवी.त्यांच्या सुरुवातीच्या कवितांवर बालकवी, भा.रा.तांबे, रविकिरण मंडळ यापूर्वीच्या कवींचा प्रभाव दिसून येतो. मात्र नंतरच्या काळात हा प्रभाव कमी होऊन त्यांची वेगळी कविता प्रकट झाली. त्यांनी ग्रामीण जीवनावर लिहिलेली कविता वेगळेपण घेऊन आली. पां.श्रा.गोरे यांच्या कवितेत ज्याप्रमाणे वास्तववादी ग्रामीण जीवनाचे चित्रण दिसते. त्याचप्रमाणे बी.रघुनाथांच्या कवितेतही ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण दिसते. या दृष्टिने *ज्वार, दुपार, मजूर, अन्नदेवा* अशा काही उल्लेखनीय आहेत. अन्नदेवा या कवितेत कष्टकरी शेतक-याला ऐन सुगीच्या दिवसात लुटणारे शासन, सावकार आणि व्यापारी यांचे वास्तववादी चित्रण करताना कवी दिसतो. *दुपार* या कवितेत दुपारच्या वेळी उन्हात उघड्या रस्त्यावर खडी फोडणारा श्रमिक तर त्याचवेळी धनिक लोक वाळ्याच्या पडद्याआड थंड रुचकर पेय रिचवत गणिकांचा विचार करीत आहेत असे परस्पर विरोधी चित्रे रेखाटली आहेत.

ग.ह.पाटील यांचा *रानजाई* हा काव्यसंग्रह सन १९३४ साली प्रसिद्ध झाला. यापूर्वी त्यांच्या सुगीतूनही काही कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. ग.ह.पाटील यांचे बालपण खेडेगावात गेलेले. प्रत्यक्ष घरची शेती असणारा हा माणूस. त्यामुळे, शेती, शेतकरी जीवन, ग्रामीण जनजीवन यांचा त्यांना सखोल अभ्यास होता. शिक्षणासाठी शहरामध्ये राहिल्यामुळे ग्रामीण जीवनाबद्दलची ओढ त्यांच्या कवितेत प्रकट झाली आहे. आपल्या वैभवशाली भूतकाळाबद्दल कवीला अभिमान आहे आणि त्यामुळेच, त्यांना ग्रामीण जीवनाबद्दल आपुलकीची भावना आहे. त्यांच्या ग्रामीण जीवनाबद्दलच्या अनुभवाचा सच्चेपणा आहे. त्यांच्या कवितेवर जुन्या कवींचा प्रभाव तुलनेने कमी आहे. साधी, सोपी भाषा हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे. पूर्वीचे वैभवशाली दिवस आता उरले नाहीत याबद्दल हळहळ व्यक्त करतानाही कवी दिसतो.

त्यांचा दुसरा कविता संग्रह *लिंबोळ्या* हा सन १९६१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यामधील भावानुभव *रानजाई* प्रमाणेच दिसून येतो. त्यांना गतवैभवाची ओढ होती याचं एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून त्यांची *हिंगणी एक ओसाड खेडे* या कवितेत एके काळी वैभवशाली असलेल्या खेड्याची दुर्दशा पाहून कवी हळहळतो.

असा कृतज्ञता भावही, खेडे, तेथील जुन्या आठवणी बद्दल व्यक्त करताना ते दिसतात. अर्थात, ग्रामीण जीवनाचा विपुल प्रत्यक्ष अनुभव पाठीशी असूनही कवीला चांगली सकस ग्रामीण कविता निर्माण करण्यामध्ये अपयश आलेले दिसून येते. याबद्दल आनंद यादव म्हणतात '*रानजाई* वाचल्यावर रुखरुख लागून राहते ती ही की या कवीने आपले ग्रामीण व्यक्तिमत्व ओळखून ग्रामीण कवितेची मौलिक प्रेरणा लक्षात घेऊन कविता लिहिली असती तर त्या काळात लोकप्रिय असलेल्या, खोली नसलेल्या, वर्णन पर, माहितीपर ग्रामीण कवितेच्या पलीकडची वास्तववादी, प्रांजळ, सच्च्या आत्मनिष्ठेतून जन्मलेली, चिंतनाने युक्त, अधिक अंतर्मुख ग्रामीण कविता जन्माला आली असती.'[१६]

*सुगी* हा पहिला ग्रामीण काव्यसंग्रह संपादन करून ग्रामीण साहित्य प्रकारामध्ये महत्वाची कामगिरी करणा-या ग.ल.ठोकळ यांनी नंतर स्वत:चा *मीठभाकर* हा स्वतंत्र काव्यसंग्रह इ.स.१९३८ मध्ये प्रसिद्ध केला. ग.ह.पाटील यांच्याप्रमाणेच ग्रामीण जीवनाचा अनुभव ग.ल.ठोकळ यांनाही होता. तरीही त्यांची कविता रोमँटिकतेच्या दृष्टीने लिहिलेली आढळते. त्यामुळे, ती रविकिरण मंडळातील कवीसारखी वाटते. खेड्यातील पती व पत्नी व प्रियकर - प्रेयसी प्रेम, शेतकरी खेडे- शहर तुलना, खेडेगावाचे वर्णन, सांस्कृतिक विशेष, खेड्यातील विविध जाती जमाती हेच विषय जे तत्कालीन कवींच्या कवितेमध्ये येतात तेच विषय ग.ल.ठोकळ यांच्या कवितेत येतात. मात्र हे विषय असले तरी त्यांचे एक वैशिष्ट्य की इतर कवींच्या कवितेत अनुभवाच्या कमतरतेमुळे तपशिलात घोटाळे दिसतात तसे घोटाळे ग.ल.ठोकळांच्या कवितेत होताना दिसत नाहीत. उलट त्यांच्या कवितेत अनुभवाचे बारकावे तपशिलात दिसून येतात. *मोटेवरलं गाणं, गरिबीचा पाहुणचार, पावसा, सावकारी पाश* या शेतक-यांच्या मनातील भाव व्यक्त करणा-या कविता वैशिष्ट्यपूर्ण आहेत. *मोटेवरलं गाणं* मधून मोट हाकणा-या शेतक-याच्या मनमोकळ्या वृत्तीचे दर्शन घडते. *पावसा* या कवितेत शेतकरी ब-याच दिवसापासून न आलेल्या पावसाला विनंती करताना दिसतो. पाऊस नाही पडला तर सावकाराचे कर्ज वाढेल व रोजगार करायला आपल्याला मुंबईला जावे लागेल व घरवाली घरामध्ये एकटीच राहील हा भाव कवितेत एक शेतकरी व्यक्त करतो. *सावकारी पाश* मध्ये वा-याने देशोधडीला लावलेल्या शेतक-याचे व्यथित मनोगत वाचायला मिळते. ग.ल.ठोकळांनी ग्रामीण जीवन अनुभवलेले असलेने ओवी व या काव्यप्रकाराच्या सामर्थ्याचे ग्रामीण जीवनातील या काव्यप्रकाराचे

महत्त्वाचे स्थान माहित आहे म्हणूनच काही ठिकाणी ते ओवीचा वापर करताना दिसतात. एका कवितेत पीक पाणी न झाल्याने रोजगारासाठी दूर गेलेल्या पतीची आठवण काढताना त्याची पत्नी म्हणते -

*अवंदाचं सालही आलं पीक पाणी*

*दूरदेशी गेला मला एकली टाकून*[१७]

या नाराजीबरोबर *तिढ न्हाई त्येला जीव लावायला कोण* ही काळजी देखील व्यक्त करताना ती स्त्री दिसते. खेडेगावातील वेगवेगळ्या वेळचे म्हणजे सकाळ, दुपार व संध्याकाळचे वर्णनही *सकाळ, सांज, गढी, माझे गांव* या सारख्या काही कवितांमधून कवी करताना दिसतो. त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनातील संस्कृतीचे दर्शनही त्यांच्या *जत्रा, गारोडी, वाघ्यामुरळी, कोळ्याचे गाणे* इ. काही कवितांमधून घडते. त्याचबरोबर *मुठभर दाणे, भिल्लांचे जग, लमाणांचा तांडा, जंगलाचा कातकरी* अशा काही कवितांमधून अनेक जाती-जमातींचे दर्शन घडते. त्याचबरोबर त्यांचे दैन्य व दारिद्र्याचे दर्शन ही येथे घडते. ग.ल.ठोकळ ग्रामीण जीवन जगून शहरामध्ये नोकरी धंद्यासाठी आलेले. त्यामुळे, त्यांना आपल्या ग्रामीण जीवनाबद्दल ओढ असणार हे स्वाभाविक आहे.

*माझे गाव, घरी, मायघर* या काही कवितांतून ही ओढ अधिक प्रभावीपणे प्रकट झाली आहे. निसर्गाचा पार्श्वभूमी म्हणून वापर करताना कवी दिसतो. त्याचप्रमाणे निसर्गातील काही घटकांचा उपमा अलंकारासाठी वापर करतानाही ते दिसतात. या सर्व गोष्टींचा विचार करता हे दिसून येते की, ठोकळांच्या कवितेत येणारे ग्रामीण जीवन इतरांच्या तुलनेत अधिक वास्तव आहे. पण बाह्य वर्णनच ठोकळ करताना दिसतात. ग्रामीण जीवानातील वास्तवावर सखोल चिंतन करताना ठोकळ आढळत नाहीत. काही वेळा त्यांची कविता तर रविकिरण मंडळातील कवितेपर्यंत रोमँटिक पद्धतीने ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना दिसते व त्यामुळे, ती वास्तवापासून दूर जाऊन कृत्रिम बनते. हे दोष जरी त्यांच्या कवितेत आढळत असले तरी, ग्राम जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव, पती-पत्नी प्रेमभावाचे चित्रण, निसर्गाचा समर्पक वापर, खेड्याबद्दल प्रकट होणारी ओढ,त्याचबरोबर त्यांच्या कवितेत नाट्यात्मकता ही त्यांच्या कवितेची वेगळी वैशिष्ट्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये ठळक उठून दिसतात. त्यांच्या कवितेत अनेक वेळा पात्र ग्रामीण संवाद बोलताना दिसतात. हे संवाद निखळ ग्रामीण भाषेमध्ये प्रकट होताना दिसतात. इतर कवींप्रमाणे नागर भाषेची मोडतोड करून ग्रामीण भाषा तयार करताना ते दिसत नाहीत. ग.ल.ठोकळ यांच्याबद्दल रविंद्र ठाकूर म्हणतात - 'ठोकळांवरील रविकिरण मंडळाचा प्रभाव स्पष्ट आहे'. तथापि, आशय द्रव्याच्या सखेपणाचा विचार करता त्यांची कविता जानपद कवितेच्या मर्यादा ओलांडते हेही खरे आहे. आपण जगलो भोगलो ते

ग्राम जीवन कवितेतून अविष्कृत करावे या प्रेरणेतून ठोकळांची ग्रामीण कविता लिहिली जाते. त्यामुळे, त्यांच्या कवितेला अपाततःच वास्तवाचे परिमाण लाभते... त्यांनी ग्रामीण माणसाला बोलते केले आहे. हे त्यांच्या कवितेचे मुख्य वैशिष्ट्य आहे'.[१८]

याचबरोबर त्यांच्या इतरही कार्याचा गौरव करताना कैलास सार्वेकर म्हणतात 'ठोकळांनी सुगी हा जानपद गीतांचा प्रातिनिधिक संग्रह काढून मराठी कवितेत ग्रामीण काव्याला विशिष्ठ स्थान मिळवून दिले'. स्वतःच्या *मीठ भाकर* हा संग्रह तर काढलाच पण इतर समकालीन ग्रामीण कवींच्या पुस्तक प्रकाशनालाही हातभार लावला. एक प्रकारे ग्रामीण कवितेला प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्यात ठोकळांचा सिंहाचा वाटा आहे'.[१९]

अर्थात असे असले तरी, त्यांच्या कविते वरील रविकिरण मंडळ कवितेचा प्रभाव नाकारता येत नाही.

त्यांच्या बाहेर जाण्याची ताकद ग.ल.ठोकळांकडे होती. परंतु, ते त्या परिघाबाहेर पडले नाहीत. तरीही त्यांच्या कवितेत ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण घडणारे दर्शन, तपशीलात नसणा-या चुका, ग्रामीण चालीरीती, संस्कृती, अनेक जाती जमातीचे घडणारे वास्तवपूर्ण दर्शन, ग्रामीण भाषेचे योग्य रुप या सर्व वैशिष्टयांमुळेच, त्यांची कविता वेगळी ठरते. म्हणूनच आनंद यादव, ग.ल.ठोकळ यांच्याबद्दल असे म्हणत असावेत- 'ठोकळांची ग्रामीण कविता इतरांच्या तुलनेत अधिक सच्ची आहे. ग्रामीण कवितेला मराठी वाङ्मयात स्वतंत्रपणे प्रस्थापित करणारा व तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा हा पहिला ग्रामीण कवी त्याच्या मर्यादा लक्षात घेऊनही मानावा लागतो.'[२०] पुढे ग.ल.ठोकळ कवितेकडून कथेकडे वळताना दिसतात. त्यामुळे, त्यांचे कविता लेखन खंडित झाले असावे.

के.नारखेडे यांचा *शिवार* हा काव्यसंग्रह स.न.१९४१ साली प्रसिद्ध झाला. त्यांच्या *सुगी* मध्येही कविता प्रसिद्ध झाली होती. त्यांनी स्फुट कविता लिहिली त्याचप्रमाणे संगम नावाचे खंड काव्य तसेच, काही कथात्मक कविताही लिहिल्या. त्यांच्या *काळजाचा तुकडा* या कवितेत ते म्हणतात -

*घामाने शिंपुनि मळा*
*पेरतो कधी जोंधळा*
*मोत्यांची खुलते कळा*
*ते अन्न - ब्रह्म वितरीते*[२१]

या कवितेचे मार्मिक विवेचन करताना आनंद यादव म्हणतात 'घाम शिंपल्यापेक्षा शेतक-याला घाम गाळावा लागतो'. शिंपण्यामध्ये सुखद संवेदना आहेत. त्या गाळण्यामध्ये नाहीत. उलट, कष्टाच्या पराकाष्टेच्या प्रयत्नाच्या अर्थसंवेदना घाम गाळणे या शब्द प्रयोगात सुचित होतात. दुस-या चरणात *कधी* हा शब्द पादपुरणार्थ आलेला असला तरी, अर्थाची हानी करणारा आहे. जोंधळा कधीतरी पेरायचा नसतो कारण, त्यावर सर्व सालाची भाकरी अवलंबून असते. नंतर मग मोत्याची कळा खुललेली अनुभूती आलेली आहे. *पेरणी* ते *मोती* देणारी *मळणी* मधले ढोरकष्ट मात्र गाळून टाकलेले आहेत. *मोत्याची खुलते कळा* हा सुखद अनुभव व्यक्त होऊन मधले वास्तव हरविले आहे... 'अन्न ब्रह्माची कल्पना मराठी शेतक-याच्या हयातीतही त्याला कधी ठाऊक नसते.'[२२]

*काय उणे मज, नाचू लागे तेही तसे* या कवितांमधूनही अशीच संवेदना प्रकट झाली आहे. सुखद शेतकरी जीवन या कवितांतून ते चित्रित करताना दिसतात. मात्र काही कवितांतून शेतकरी, मजूर यांचे दु:ख वास्तवतेने चित्रित झाले आहे. त्यांची *गुराखी* कविता या दृष्टीने महत्वाची आहे. तांब्यांनी त्याच विषयावर लिहिलेले *गुराख्याचे गाणे* व नारखेडे यांचा *गुराखी* यांच्यामधील फरकही लक्षणीय आहे. तांब्यांच्या कवितेतील गुराखी गायी वळत वडाखाली बसविलेला आहे. तर नारखेडे यांच्या कवितेतील गुराखी दारोदार फिरून गोठाणांवर गुरे जमवितो. धावणा-या गुरांमागे धावतो. तांब्यांच्या कवितेतला गुराखी आनंदाने पावा वाजवितो. द-या, रान, ओहोळावरती मौज करतो तर, नारखेडेंच्या कवितेतील गुराखी गुरांमागे कुंपण, काट्यांमधून धावतो. त्याच्या पायात काटा बोचतो. त्याला ठेच लागते असे वास्तवदर्शी चित्रण करताना नारखेडे दिसतात. काळाच्या ओघात ग्रामीण कवितेच्या मधील बदलही या कवितेच्या निमित्ताने दिसून येतात. मे,१९०२ मध्ये तांब्यांनी गुराख्याचे गाणे लिहिले. तर सर्वसाधारणपणे १९३५ ते १९४० च्या दरम्यान नारखेडेंनी ही कविता लिहिली. आशय एकच असतानाही त्यातील बारकाव्यांचा फरक येथे दिसून येतो. अर्थात काही वेळेस ते अतिरंजित वर्णनही करताना दिसतात. याच कवितेत सुकी भाकर आसवात भिजवून खातो. असे कवी वर्णन करतान दिसतो. *दस-याचे सोने* मध्येही गरीब शेतकरी आपल्या कडब्याची धाटं कोणी घेऊन जाऊ नयेत म्हणून राखण करतो. पण तरीही, त्याची धाटं लोक नेतातच. कवी पूर्वीच्या व आत्ताच्या दस-यामधील फरक वर्णन करताना म्हणतो -

*पूर्वी दस-याला वीर पूर्वजांनी*
*भव्य रिपुनगरे आणिली लुटोनी*

*आज आम्ही दिग्विजय परिकरोनी*

*दीन-दुबळा रडवितो बंधु कोणी*[२३]

नारखेडेंनी काही प्रेम कविताही ग्राम्य जीवनावर लिहिल्या. परंतु, त्या रंजकतेने भरलेल्या दिसतात.

त्यांच्या काही कथा काव्यांमध्ये *अमरवेल, शिवबा, राणूचे शेत, वेडी, अंजनीच्या झाडा काढा* ही कथा काव्ये *शिवार* मध्ये आहेत. अद्भुतरम्यता हाच गुणविशेष त्यांच्या या कथाकाव्यांमधून दिसून येतो. *शिवार* काव्यसंग्रहाच्या शेवटी *संगम* हे एक खंड काव्य आहे. अर्थात, या पूर्वीच्या खंडकाव्यांचा प्रभावच या खंडकाव्यांवर दिसून येतो. फक्त नारखेडे येथे साधी सरळ भाषा वापरताना दिसतात. पूर्वीच्या खंडकाव्यांप्रमाणेच अनपेक्षित योगायोग, संकटांची मालिका, तिचे खंडित होणे हे सर्व प्रकार या खंडकाव्यातही दिसून येतात.

अशा प्रकारची नारखेडेंची कविता रविकिरण मंडळाच्या प्रभावाखाली असणारी कविता आहे. काळाच्या ओघात तिच्यामध्ये बदलही घडून आला आहे. ते शिवार च्या निमित्ताने दिसून येतो. कथात्मकता हा त्यांच्या कवितेचा गुणविशेष दिसून येतो.

सोपानदेव चौधरी हे बहिणाबाईंचे पुत्र. १९३२ साली यांचा पहिला काव्यसंग्रह *काव्यकेतकी* प्रसिद्ध झाला तर दुसरा काव्यसंग्रह *अनुपमा* १९५० साली प्रसिद्ध झाला. त्यातील काहीच कविता ग्रामीण कविता आहेत. सोपानदेव काव्य गायन करायचे. त्यामुळे, काव्यगायनाचा उद्देश डोळ्यांसमोरे ठेऊन त्यांनी आपले काव्यलेखन केलेले दिसते. त्यामध्ये विनोदाची निर्मिती मोठ्या प्रमाणात करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. अर्थात, यामुळे, ही कविता ग्रामीण जीवनाच्या वास्तवापासून दूर गेलेली दिसते. अर्थात, त्यांनी मराठी ग्रामीण कवितेबद्दल एक मोलाचे कार्य केले ते म्हणजे त्यांनी आपली आई बहिणाबाई यांच्या कविता वेळोवेळी उतरवून घेतल्या व पुढे प्रसिद्ध केल्या. बहिणाबाईंच्या कवितेप्रमाणे सोपानदेवांची कविता नाही हे ही येथे नमूद करावेसे वाटते.

बहिणाबाई चौधरी यांची कविता म्हणजे मराठी ग्रामीण कवितेला पडलेले एक सुंदर स्वप्नच आहे. त्यांची कविता प्रत्यक्षात इ.स.१९५२ ला रसिकांच्या समोर आली. परंतु, त्यांचे लेखन इ.स.१९१५ ते २० दरम्यान झाले असावे. येथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. ज्यावेळी मराठी ग्रामीण कविता निर्माण झाली नव्हती. त्यावेळी परिपूर्ण अशी ग्रामीण कविता बहिणाबाईंनी निर्माण केली होती. बहिणाबाईंची कविता इतकी सर्वांग सुंदर होती की त्या कवितेची अनेकांनी प्रशंसा केलेली दिसते. रविंद्र ठाकूर म्हणतात-

'बहिणाबाईची गाणी समोर आली, तेंव्हा आडरानात मोहरांचा हंडा सापडावा तसा मराठी वाचक हरखून गेला.' ही कविता साधी सोपी होती परंतु, बाळबोध नव्हती. रविकिरणी पद्धतीची भडक आणि कृतक ग्रामीण नव्हती. अवघे ग्रामीण जीवन त्याच्या सर्व अंगोपांगासह येथे शब्दरुप झालेले होते. ग्रामीण वातावरणाचे खरे दर्शन मराठी वाचकाला बहिणाबाईंच्या कवितेत झाले. या अर्थाने ती सच्च्या ग्रामीण संवेदनशीलतेतून लिहिली गेलेली कविता होती.'[२४] बहिणाबाईंची कविता पाहून आचार्य अत्रेही प्रभावीत झाले. त्यांनी आपल्या वर्तमानपत्रातून या कवितेची स्तुती केली व ती प्रसिद्ध केली. बहिणाबाईंचे लौकिक अर्थाने शिक्षण झालेले नव्हते. त्यांना लिहिता वाचताही येत नव्हते. (म्हणूनच त्यांची कविता त्यांचे पुत्र सोपानदेव चौधरी यांनी लिहून घेतली.) त्यांची कविता सर्वस्वी वेगळी होती. तिला कोणतीही पूर्वपरंपरा नव्हती. फक्त लोकगीतांच्या परंपरेची पार्श्वभूमी मात्र त्यांना लाभली होती. त्यांना स्त्रियांच्या ओव्यांचाही स्पर्श झालेला आढळतो. बहिणाबाई जरी शिकलेल्या नसल्या तरी, त्यांना जीवनाचा अनुभव मात्र प्रचंड होता. जीवनातील बारकावे त्या हळुवारपणे आपल्या कवितेत टिपताना दिसतात. सभोवतालचा निसर्ग, शेती, कुटुंब, वेगवेगळी माणसे, आणि समाज या पासून त्यांना खूप काही शिकायला मिळाले. त्यांचे जे अनुभव विश्व होते त्यांनी ते प्रभावीपणे चित्रित केले.

कविता सहज आणि उत्स्फूर्तपणे कशा प्रकारे निर्माण होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे बहिणाबाईंची कविता.त्यांनी कविता निर्माण करायची म्हणून केली नाही तर त्यांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे ही कविता प्रकट झाली.

बहिणाबाईंचे जीवन खेडेगावामध्ये व्यतित झाल्यामुळे त्यांच्या कवितेमध्ये निसर्ग प्रभावीपणे प्रकट होताना दिसतो. एवढेच नव्हे तर त्यांच्या सर्वच कवितेवर निसर्ग, शेती यांची दाट छाया असलेली दिसते. ज्याप्रमाणे जनाबाईला देव नेहमी आपल्याला मदत करतो असे वाटते त्याचप्रमाणे बहिणाबाईंना मातीमध्ये, पावसामध्ये, पिकामध्ये देव दिसतो. त्या म्हणतात -

*माझ्यासाठी पांडुरंगा*
*तुझं गीता भागवत*
*पावसात सामावतं*
*माटी मधी उगवतं*
*अरे देवाचं दर्शन*[२५]

देवाची चाहूल पानापानातून लागते तर देवाच येणं जाणं वारा सांगतो. शेती हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने त्यांच्या कवितेत शेतीचेही दर्शन घडते. पेरणीचे महात्म्यही त्या सांगताना म्हणतात -

*पेरनी पेरनी*

*अवघ्या जगाच्या कारनी*

*ढोराची चारनी*

*कोटा पोटाची भरनी*[२६]

पेरनीबरोबरच उगवणा-या पिकांचे सुरेख वर्णन कवयित्री करताना दिसते. शेतक-याला नेहमी साथ करणारे बैल व त्यांच्या बैल पोळ्याच्या सणाचे दर्शन ही कवयित्री करते. त्या दिवशी बैलांच्या शर्यती घेतल्या जातात त्यावर टीका करताना कवयित्री म्हणते -

*नका हेंडाळू बैलाले*

*माझं ऐका रे जरासं*

*व्हते आपली हाऊस*

*आने बैलाले तरास*[२७]

बहिणाबाई आपल्या कवितेतून दलित लोकांचे जीवनही चितारताना दिसतात. दलित लोकांची जी स्थिती त्यांना दिसून आली ती स्थिती सांगताना त्या दिसतात -

*देखा महारवाड्यात*

*कशी मानसाची दैना*

*पोटामधी उठे आग*

*चुल्हा पेटता पेटेना*[२८]

त्यांच्या एका कवितेत गरीब श्रीमंतीचा भेद देवांच्या द्वारे त्यांनी पटवला आहे. खरे तर देव एकच पण त्यांना आपण भेद आणला असे त्या सांगताना दिसतात.

त्यांनी ज्या कवितेमधून मानवी स्वभावाचे चित्रण केले आहे त्या कविता लोकप्रिय झाल्या मानवी मनाचे वर्णन करताना त्या म्हणतात-

*मन वढाय वढाय*

*उभ्या पिकातलं ढोर*

*किती हाकला हाकला*

*फिरी येतं पिकावर*[२९]

मानवी मन ओढाळ जनावरासारखं असते असे सांगताना त्या दिसतात. तसेच, त्या म्हणतात -

*मन जह्यरी जह्यरी*

*याचं न्यारं रे तंतर*

*अरे इचू साप बरा*

*त्याले उतारे मंतर*[३०]

त्याचप्रमाणे स्वार्थासाठी माणूस कानूस होताना दिसतो असेही त्या म्हणतात. संसाराबद्दलही त्यांनी व्यक्त केलेले मत अतिशय लोकप्रिय आहे.

*अरे संसार संसार*

*जसा तवा चुल्ह्यावर*

*आधी हाताला चटके*

*तव्हा मियते भाकर*[३१]

कष्टाशिवाय भाकर खायला मिळत नाही हेच त्यांना येथे सांगायचे आहे. माणसाचा जीव आणि त्याचं जीवन याबद्दलचं बहिणाबाईंचं भाष्य *माझ्या जीवा* या कवितेत प्रकट होते. जन्म आणि मृत्यू या दोन्ही मधला माणसाचा मुक्काम म्हणजे जीवन असे सांगताना दिसतात. त्यांच्यावर हिंदू मताचा असणारा प्रभावही येथे प्रकट होतो.

अशा प्रकारची बहिणाबाईंची कविता जीवनातील सर्वच अंगाला स्पर्श करताना दिसते. शेती, निसर्ग,मानवी स्वभाव, जीवनाचे तत्वज्ञान, संसार, दलित जीवन यांचे प्रभावी चित्रण त्या करताना दिसतात. साधी सोपी भाषा, वाक्प्रचार, म्हणी यांचा वापर. खानदेशी बोलीचा वापरही त्यांनी सुयोग्यपणे केला आहे. त्या जे जीवन जगल्या ते सच्चेपणाने त्यांनी कवितेत प्रकट केले. अनुभवाचा सूक्ष्मपणा त्यांच्या कवितेत आढळतो. त्यांच्या कवितेत उपहासात्मक विनोदालाही स्थान आहे. या कवितेने ग्रामीण कवितेला एक वेगळेपण दिले. त्यांनी ग्रामीण कवितेला दिलेली देणगी बहुमोल अशी आहे.

इ.स.१९६० नंतरच्या काळात ग्रामीण साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले जाऊ लागले. अनेक मराठी लेखक कथा, कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे चित्रण करू लागले. या काळात मराठी कवितेवर व कथेवर नवकाव्य व कथेची छाप पडली. या काळात मराठी ग्रामीण कवितेची वाटचाल मात्र धिम्या गतीने

होती. एकच प्रभावी कवी मराठी ग्रामीण जीवन आपल्या कवितेत रेखाटताना या काळात दिसतो तो म्हणजे आनंद यादव. त्यांचा *हिरवे जग* हा काव्यसंग्रह इ.स.१९६० साली प्रसिद्ध झाला. पुढे *मळ्याची माती व मायलेकरं* (प्रदीर्घ संवादकाव्य) हे संग्रहही प्रकाशित झाले. आनंद यादवांचा कवितेकडे लहानपणापासून ओढा होता. हे त्यांनीच सांगितले आहे. त्यांनी यापूर्वी सर्वच ग्रामीण कविता अभ्यासली होती. तसेच, शालेय जीवनातही या कविता त्यांच्या अभ्यासक्रमात होत्या. *सुगी* व इतर रविकिरण मंडळाची कविता अभ्यासताना आनंद यादवांना जाणविले की, या जानपद कवितांमधून खरे ग्रामीण अनुभव चित्रीत झालेले आढळत नाहीत. यामध्ये जे अनुभव व्यक्त झाले ते कृत्रिम आहेत. त्यांच्या तपशीलातील चुकाही आनंद यादवांच्या लक्षात आल्या. कारण, आनंद यादवांचे जीवन कागल सारख्या ग्रामीण भागात एका शेतक-याच्या कुटुंबामध्ये व्यतीत झाले होते. ते स्वत: शेतावर लहानपणापासून राबत होते. त्यामुळे या कृषिजीवनाचे सखोल ज्ञान त्यांना होते. त्याचमुळे, त्यांनी जानपद कविता ज्या वेळी अभ्यासली त्यावेळी ते तिच्या स्वरुपामुळे अस्वस्थ झाले व खरे ग्रामीण जीवन कवितेमध्ये रेखाटण्यासाठी ते कवितेकडे वळले.

शेतकरी, शेती, ग्रामीण जीवन, त्यातील दारिद्र्य, त्यांनी अनुभवलेला निसर्ग तसेच, शेतक-याचे प्रेम जीवन या भोवती त्यांची कविता फिरत राहते. त्यांच्या कवितेतील शेतकरी जीवन गरीब व कष्टाळू असे आहे. शेतीमध्ये स्वत: घाम गाळणारा शेतकरी शेतीवर अनन्य साधारण श्रद्धा ठेवणारा आहे. तोच त्याचा देव आहे. *माती हे धन असतंय* या कवितेत शेतकरी आपल्या देवाचं आणि मातीचं महात्म्य गाताना म्हणतो -

*डोंगरागत आमचा देव असतोय*
*या डोंगरालाबी दगडाचं मन असतंय*
*हे मन फुलवितानं आम्ही मातीत जातोय*
*पण पुढे तो म्हणतो -*
*पर मातीत गेलो तरी माती हे धन असतं.* [३२]

*हे माती हे माते* या कवितेत काळ्या मातीवर काळ्या विठ्ठलाचे रुपक येते. युगानुयुगांपासून जसा विठ्ठल करकटावर ठेऊन उभा आहे त्याप्रमाणे ही माती ही त्या विठ्ठलासारखी संयमशील आहे. तिच्यापुढे कित्येक संस्कृत्या आल्या गेल्या, अनेक ऋतू आले गेले पण ती तशीच स्थिर आहे.

त्यांच्या कवितेत शेतमजुराच्याही व्यथा येतात. शेतीसाठी पाऊस अत्यंत गरजेचा असतो. पण, सतत पडणा-या पावसामुळे काम मिळत नाही म्हणून दु:खी झालेल्या एका शेतमजुराचे दु:खही त्यांच्या

एका कवितेत आले आहे. पेरणीच्या दिवसात खायला मिळत नाही म्हणून शेतमजूर उपवास करतो. पेरणी करताना उपवासाच्या बहाण्याखाली शेतक-याच्या पेरणीच्या दाण्यातील इतभर दाणे खातो. घरी भाकरीचा तुकडा खायाला नसल्याने पेरणीच्या ओटीतील थोडे धान्य उरवून घरी घेऊन जातो.

त्यांच्या कवितेत येणारा निसर्ग हा शेतीचा अविभाज्य घटकच झाला आहे. *मोम पुनवेला* या कवितेत स्वच्छ आभाळ-बिन आठ्याचं कपाळ, त्यावर चांद टिळा, दहिवरलेल्या चांदण्यातील गवत इ. निसर्गाच्या प्रतिमा वापरताना ते दिसतात. *गर्भ धरतीचा* या कवितेत पाण्याविना पालवी झडू लागली म्हणून चार मास तरी या बाळाच्या पोटात दूध (म्हणजेच पाऊस) पडू दे आणि ही काळी आई सुखासमाधानानं मोकळी कर असे ते म्हणतात.

त्यांच्या कवितेत व्यक्त होणारी प्रेमभावना प्रामुख्याने शेतकरी पती-पत्नीची आहे. आनंद यादवांनी ग्रामीण जीवन स्वत: अनुभविल्या मुळे, त्यांना खेडेगावातील एकत्र कुटुंबातील स्त्रिया पतीबद्दल कशाप्रकारे प्रेमभाव दाखवितात हे माहीत आहेत. *तळची भाकर* या कवितेतील कारभारीण आपल्या घरधन्यासाठी न्याहारीच्या भाकरीमध्ये सर्वात तळची भाकरी ठेवते. त्या भाकरीच्या पापडाखाली लोणी, सांडगे ठेवते व तुम्ही दीर मामांजी नंतर न्याहारीला जावा असं खुबीनं सांगते. जानपद कवितेमध्ये व्यक्त होणारी प्रेमभावना व या कवितेतील प्रेमभावना यामधील फरक चट्कन डोळ्यात भरतो. ज्याप्रमाणे पत्नी पतीवर प्रेम करते त्याचप्रमाणे पतीदेखील पत्नीवर प्रेम करतो तेही याच पद्धतीने. *बाई माणूस* या कवितेत पत्नीने अंगभर नेसले पाहिजे व थानंच मूल असल्यानं पोटभर खाल्लं पाहिजे ही तळमळ पती व्यक्त करताना दिसतो.

त्यांच्या कवितेबद्दल विश्वास जहागीरदार म्हणतात- 'आनंद यादवांची कविता हा मराठी साहित्यातील ग्रामीण संवेदनशीलतेच्या कविता या प्रकारातील अविष्कारांमधला एक मैलाचा दगड आहे.'[३३]

तर अनुराधा पोतदार आनंद यादवांबद्दल म्हणतात- 'ग्रामीण जीवनातून नागर जीवनातील संक्रमणाच्या अंतर्यामी अनुभविलेल्या व्यथा, वेदना, आंदोलन, ओढाताण यांचाच अविष्कार या नंतरच्या कवितांत झालेला दिसतो'. एक प्रकारे हा एका दुभंगलेल्या व्यक्तीमत्वाचाच प्रवास आहे. प्रत्येक सुशिक्षित, संवेदनशील ग्रामीण व्यक्तीला चढावी लागणारी ही अवघड पायरी आहे. आणि तिचाच आलेख या कवितेत उमटला आहे.'[३४]

मराठी ग्रामीण कवितेला एक वेगळे वळण यादवांच्या कवितेने दिले. त्यांनी ग्रामीण माणसाला आपल्या कवितेतून बोलते केले. त्यांच्या कवितेतील निसर्ग शेतीशी एकरूप झाला. अस्सल ग्रामीण भावजीवन, तेथील समस्या व तेथील अनुभव त्यांच्या कवितेत चित्रीत झाले.

इ.स.१९६० नंतरच्या काळात एक प्रतिभावंत ग्रामीण कवी ग्रामीण साहित्याच्या प्रवाहामध्ये येऊन मिळाला तो म्हणजे ना.धों.महानोर. त्यांचा पहिला कवितासंग्रह *रानातल्या कविता* हा इ.स.१९६७ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर *वही (१९७१), पावसाळी कविता (१९८२), अजंठा (१९८४), प्रार्थना दयाघना (१९९०)* हे काव्य संग्रह प्रसिद्ध झाले. यावरून, त्यांनी दीर्घकाळ व विपुल प्रमाणात काव्यलेखन केलेले दिसून येते. या शोध निबंधाच्या दृष्टीनेही महानोर कवी महत्वाचे आहेत. कारण कवी नारायण सुमंत यांनी साहित्य संपदा या दीपावली विशेषांकात (स.न.२००१) आपल्या मुलाखतीमध्ये आपल्यावर ना.धों.महानोर व विठ्ठल वाघ यांचा प्रभाव असल्याचे कबूल केले आहे.

महानोरांच्या *रानातल्या कविता* हा पहिला संग्रह त्यांच्या नावाप्रमाणेच शेतातच अधिक रमतो. शहरामध्ये शिक्षण घेऊन पुन्हा आपल्या पळसखेड या गावी आल्यानंतर शेतामध्ये स्वत: राबत असताना त्यांचे मन त्या शेताशी एकरुप झाले व त्यांचे भावानुभव कवितेमध्ये उतरविले. ते जसे प्रतिभावंत कवी आहेत त्याप्रमाणे त्यांची काव्यलेखनाची चिकाटी ही दांडगी आहे. आपल्या काव्यलेखनाबद्दलचे मनोगत त्यांनी सदानंद साहित्यमंडळाच्या साहित्य संमेलनामध्ये (सन २००३) व्यक्त केले. आपण एका एका काव्यलेखनाबद्दल घेतलेले कष्ट त्यांनी सांगितले. त्यांच्या कवितेतून रानाची विविध रुपे, अविष्कार, रंग, नाद प्रकट झालेले आहेत. त्यांच्या पहिल्याच कवितेत त्यांचे रानाशी असलेले नाते स्पष्ट होते. त्या कवितेत ते म्हणतात -

*या शेताने लळा लाविला असा की,*
*सुख-दु:खाला परस्परांशी हसलो-रडलो*
*आता तर हा जीवच अवघा असा जखडला*
*मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो*[३५]

महानोरांची या शेताशी इतकी एकरुपता आहे की या शेताशी एकरूप झाल्यनंतर सुख-दु:खाशी परस्परांशी हसले-रडले. शेवटी ते त्या शेताचा शब्द जाहले. म्हणजेच, त्यांचे व्यक्तिमत्व रानाशी एकरुप होऊन गेले. त्यांच्या कवितेत येणारे रान हे विविध रुपे धारण करते. पावसामुळे, झाडे हिरवीशी होतात. रानात शिळ घुमते. जांभळ्या मेघांची ओळ नदीच्या पाण्यात वाहू लागते. वाट झुंजुमुंजु होते. पाखरांचे

थवे पाण्यात खेळ मांडतात. दाट हिरव्या गर्दीत पाय बहकून जातात. क्वचित पावसाअभावी नग्नदेही झाडे ग्रासून जातात. परंतु, महानोरांचा अधिकाधिक कल हा निसर्ग प्रतिमांतून प्रणयभाव व्यक्त करण्याकडेच अधिक आहे. त्यांच्या प्रसिद्ध कवितेत ते म्हणतात -

*हिरव्या पानांत-पानांत काही चावळ चालते*

*भर ज्वानीतही ज्वार अंग मोडीत बोलते* [३५]

हिरव्या पानांत होणारी हालचाल ही त्यांना प्रणय क्रीडा वाटते. तर पक्व झालेली ज्वार त्यांना युवतीसारखी अंग मोडणारी वाटते.

त्याचप्रमाणे मानवी रुपांनाही ते निसर्गप्रतिमांच्या रुपानेच पाहताना दिसतात. स्त्री हासताना तिच्या डोळ्यांत नभ भरून गेलेले असतात. तिच्या काचोळीला चांदण्याचा जर असतो. मिठीत आल्यावर ती भरातली ज्वार होते. चिट्पाखराच्याही नजरेत तिचे रुप भरते. कधीकधी निसर्ग प्रतिमाच स्त्री रुपे घेऊन येतात. उदा. नभ, भुई, पाण्यात निथळणारेचे केळीचे बन, गव्हाचे पिवळे शेत, आंब्याच्या झाडाचा मोहराचा वास, गाभुळलेल्या चिंचेच्या पोटी न धरवला जाणारा भार, पानमळ्यातील उभार शेताच्या वेली, पाऊस लचकणारी चंद्रगौरी बसंती हे सारं पाहिल्यावर कवी मन दु:खाचा काळिमा विसरतं व प्राण उधळून केळीच्या बनात लकेर घेतं. *वही* या कवितासंग्रहातील कविताही आशयाच्या दृष्टीने रानातल्या कवितेसारख्याच आहेत.

*बगळ्याच्या ढवळ्या माळा आभाळ गेल्या*

*तिच्या लालसर नखांत मेंदी गोंदून आल्या* [३७]

अशा प्रकारे, प्रणयाचे भाव निसर्ग प्रतिमातूनच रेखाटणारी त्यांची शैली येथेही प्रकट होते. *पावसाळी कविता* काही अंशी रोमँटिकतेकडून वास्तवतेकडे झुकताना दिसते. *वही व पावसाळी कविता* मध्ये लोकगीताचा अभिव्यक्तीसाठी वापर त्यांनी अधिक प्रमाणात केलेला दिसतो. खरे तर त्यांचे लोकगीताशी नाते रानातल्या कवितांपासूनच दिसून येते. लोकगीतांचा त्यांच्यावर असणारा प्रभाव त्यांच्या संपूर्ण कवितांवर दिसतो. म्हणूनच त्यांनी पळसखेडची गाणी हा त्यांच्या प्रदेशातील लोकगीतांचा संग्रह संग्रहीत केला. पावसाळी कवितेतील स्त्री आपले सासुरवाशीणीचे दु:ख व्यक्त करताना म्हणते -

*बाई जन्माचे धिंदोडे?*

*सांगू कसे, झाकू कसे?*

*चुलीतल्या गोवरीला*

*चुलीमधी जळायचे.* [३८]

पावसाळी कवितेपासूनच त्यांची कविता राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकताना दिसते.

*अजिंठा* ही त्यांची प्रदीर्घ कविता म्हणजे चित्रकार व इंग्रज अधिकारी, मेजर रॉबर्ट गिल व पारु या बंजारा जमातीच्या मुलीची अजिंठ्याच्या परिसरात घडलेली प्रेमकथा आहे. अर्थात या कवितेत कृषिजनतेची कोणतीही वैशिष्ट्ये आढळत नाहीत. ते एक प्रेमकाव्य आहे.

*प्रार्थना दयाघना* या कविता संग्रहात त्यांची कविता ग्रामीण वास्तवाच्या अधिक जवळ गेली आणि तेथील भीषण वास्तव तिने चव्हाट्यावर मांडले. या संग्रहातील मनोगतामध्ये महानोर म्हणतात - रानातल्या कविता मधला हिरवा निसर्ग, नागमोडी पाऊलवाटा, निसर्गाइतकंच निर्मळ, सुंदर प्रेम व शृंगार, हिरवं गोंदणं व तळ्यातलं चालणं हळूहळू विस्कटून चाललं आहे. खेड्यातलं लोकसंगीत, माणसांमाणसामधला ओला जिव्हाळा, जात-पात विसरून एकत्र नांदणारं सांस्कृतिक खेडं आज विस्कटून चाललं आहे. या त्यांच्या मनोगतामध्ये बदललेल्या खेड्याची त्यांना झालेली जाणीव व्यक्त होते. त्याचेच प्रतिबिंब या संग्रहातील प्रत्येक कवितेत पडलेले दिसते. त्याच काळात त्यांनी पाणी अडवा, पाणी जिरवा या मोहिमेचा जोरदार पुरस्कार केला. कृषिशास्त्रावरची पुस्तकेही लिहिली. अशा उत्स्फूर्त उर्मीतून *प्रार्थना दयाघना* मधील कवितांची निर्मिती झाली असावी. शेतीची बिघडत चाललेली अवस्था, राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणा, निष्ठावान माणसांचा अभाव याचे विदारक चित्रण त्यांच्या कवितेत दिसून येते. त्यांच्या कवितेतील प्रतिमांनाही या काव्य संग्रहात वेगळे परिमाण लाभले. विशेषत: मर्ढेकरांपासून आलेल्या नवकवितेने मानवी जीवनाचे जे दर्शन घडविले, त्याप्रमाणे प्रथमत: महानोरांची कविता ग्रामीण जीवनाचे दर्शन *प्रार्थना दयाघना* या संग्रहातून घडविते. या नभाने या भुईला दान द्यावे. असे म्हणणारा हा कवी ग्रामीण जीवनातील प्रत्यक्ष वास्तव पाहून अधिक वास्तवमुख झाला आणि ग्रामीण जीवनातील हे वास्तव जीवन आपल्या कवितेतून रेखाटू लागला. या संग्रहातील त्यांच्या कवितेचे स्वरुप पार बदललेले दिसते. आतापर्यंत विपरीत वाटणा-या अनुभवांमुळे, दु:खामुळे, समाज वास्तवापासून अलग होऊ पाहणारा, निसर्ग, रानशेत, पाखरे यांच्या प्रतिमांतील स्त्री-पुरुष रुपात एकरुप झालेला कवी या संग्रहात सभोवतालच्या वास्तवाला सरळ सामोरा जाताना दिसतो.

महानोरांनी आपल्या कवितेमुळे, मराठी साहित्यात वेगळे स्थान निर्माण केले. हा कवी शेतात ज्याप्रमाणे रमला त्याप्रमाणे बदलते ग्रामीण जीवन रेखाटण्यातही यशस्वी झाला. निसर्ग प्रतिमातून प्रणय आणि शृंगाराचे दर्शन घडविण्यात त्यांची कविता यशस्वी झाली त्याच प्रमाणे त्यांची कविता बदलत्या

काळातील शेती समस्या, शेतकरी वर्गाचे भीषण वास्तव व राजकीय वास्तवाचे दर्शनही घडविताना दिसते. ते ज्याप्रमाणे शेतीशी, रानाशी एकरुप झाले तशी एकरुपता मराठी कृषिजन कवितेमध्ये क्वचितच दिसून येते. त्यांच्या कवितेचा प्रभाव पुढे अनेक कवींवर पडलेला दिसतो. ना.धों.महानोरांच्या कवितेबद्दल वा.ल.कुलकर्णी म्हणतात- 'त्यांच्या कवितेतून खरंखुरं मराठी खेडं आज प्रथमच साकार होतंय. जे मन हे अभिनव अनुभवविश्व साकार करीत आहे ते खेड्याच्या मातीतूनच वर आलेले व त्या मातीतच सदा राबणारे व रमणारे असे संवेदनाक्षम मन आहे. त्याच्या अनुभुतीचे व अभिव्यक्तीचे आदर्श शहरी नाहीत.'[३९] बहिणाबाई चौधरींच्या कवितेसारखी महानोरांची कविता ही कृषिसमूहाचे अविष्कार घडविते हे राजन गवस यांचे विधान समर्पक वाटते.[४०]

महानोरांच्या अविष्काराबद्दल व सामर्थ्याबद्दल म.सु.पाटील म्हणतात- 'महानोरांचे सामर्थ्य वेगळे आहे, त्यांनी रती या प्राकृतिक भावाच्या अगणित छटा प्राकृतिक लयीतून आणि प्राकृतिक प्रतिमांच्या माध्यमातून कथनपरता आणि वर्णनपरता शक्य तितके टाळून उत्कटवाने अविष्कृत केलेल्या आहेत.'[४१]

*झोळणा (१९६४)* या सरोजिनी बाबर यांच्या संग्रहातून मराठमोळ्या स्त्रीचे माहेर, सासर, मुलांबाळात रमलेले पारंपारिक कष्टाळू मन ठायी ठायी प्रत्ययास येते. पारंपारिक लोकगीते, अभंग असे रचना प्रकार त्या ठिकाणी हाताळताना दिसतात. स्त्रीसुलभता हा गुण प्रामुख्याने या कवितेत दिसून येतो. खेड्यातील स्त्रियांचे भावजीवनही रेखाटताना बाबर दिसतात. सूर्याची मनोभावे पूजा करणारी, आपल्या बाळावर तोच संस्कार रुजविणारी, संपत्तीला *लक्ष्मी आई* मानणारी, तुळशीला जिवाभावाची मैत्रीण मानणारी, अशी स्त्री त्यांच्या कवितेत रेखाटली गेली आहे. ही स्त्री खेड्यातील स्त्रियांच्या प्रमाणे पशूंची देखभाल करणारी, त्यांचे दूध काढणारी आहे. माहेराबद्दल ओढ, आपल्या आजोळचं कौतुक अशा स्त्री सुलभ भावना व्यक्त करणारी ही स्त्री आहे. पाळणा, अंगाई गीत गाताना ही स्त्री दिसते. काही कवितांतून संसाराचे चित्रणही येते. सरोजिनी बाबरनी या संग्रहामध्ये काही कविता शिवजन्म सोहळ्यावर, गांधीजींच्यावर, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेवर त्याचप्रमाणे मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करण्यावरही लिहिल्या आहेत. या कविता पाहिल्या असता त्यांनी कमी प्रमाणात काव्य लेखन केले असले तरी, त्यांची काव्य लेखनाची शैली वेगळी आहे. त्यांच्यावर कोणत्याही पूर्वकवीची छाप पडलेली दिसत नाही. उलट परंपरागत पद्धतीने त्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण करताना दिसतात. रचनेतील साधेपणा, स्त्री सुलभ वृत्ती, लोकगीतांचा प्रभाव इ. गुण त्यांच्या कवितेत दिसून येतात.

*तळ्यातल्या साक्ल्या* हा पुरुषोत्तम पाटील यांचा कविता संग्रह इ.स.१९७८ साली प्रकाशित झाला. त्या अगोदर ते दीर्घकाळ काव्यलेखन करीत होते. त्यांच्या कवितेमध्ये प्रेमालाच प्राधान्य असलेले दिसून येते. तसेच, त्यांच्यावर शहरी संस्काराचा प्रभाव आहे. खरे तर, त्यांचे अनुभवविश्व ग्रामीणच आहे. पण, त्यांच्या कवितेची अभिव्यक्ती होताना ते शहरी शब्द योजना करताना दिसतात. त्यामुळे, त्यांनी व्यक्त केलेले अनुभव ग्रामीण असले तरी, ते शहरी पद्धतीने प्रकट झाल्याने त्यातील ग्रामीणता कमी झालेली दिसते.

*खळ्यात* या कवितेतील प्रियकर आपल्या प्रेयसीला कमरेला पदर खोऊन उपणवा-याला साथ दे असे म्हणतो. याच प्रकारे *झाड, चढतीचे ऊन, रान तुझे, झरा उपसातां, पहाट, बोभाटा, नवी उमटली पाऊलवाट डोंगरकपारी उतरताना*, *काही सैलसर शब्द* अशा काही कवितांतून शृंगार चित्रणासाठी पार्श्वभूमी ग्रामीण त्याचप्रमाणे निसर्ग प्रतिमांचा वापर करण्यात आलेला दिसून येतो. परंतू, अभिव्यक्ती करताना पाटील शहरी शब्दयोजना करताना दिसतात.

त्यांच्या काही कवितातून मात्र ग्रामीण अनुभव प्रभावीपणे चित्रीत झालेले दिसतात. *पाहुणे* या कवितेत एका पाहुण्याचे केले गेलेले स्वागत आहे. या कवितेत ताट, पाट, सडा, विडा इ. जे उल्लेख येतात त्यामुळे, त्या कवितेतील ग्रामीणता गडद होताना दिसते. *तळहात* या कवितेतही ग्रामीण स्त्रीचे कष्ट चित्रीत केले गेले आहेत. तिच्या तळहाताने सोसलेले कष्ट, वेदना यांचा आलेख या कवितेत मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तिच्या तळहाताला जात्यावर दळताना, आडाचे पाणी शेंदताना, भाकरी भाजताना, भांडी घासताना झालेल्या वेदना येथे चित्रीत केलेल्या दिसतात.

पुरुषोत्तम पाटील यांनी या काव्य संग्रहानंतरही काही नियतकालिकातून काव्य लेखन केलेले दिसते. त्यांचे काव्यलेखन उत्तरोत्तर ग्रामीण वास्तवाच्या जवळ गेलेले दिसते. *विसावा* या कवितेत खेड्यातील स्त्रीची विविध रुपे (वेगवेगळ्या वेळची) चित्रीत होतात. यातूनच ती दिवसभर जी कष्ट करते त्याचेही चित्रण होताना दिसते. *कुंकू लालजर्द झालं* या कवितेतही दु:खी, कष्टी, ग्रामीण स्त्रीला लोक परंपरेत कशा प्रकारे विसावा मिळतो हे भाव व्यक्त झालेले दिसतात. पुरुषोत्तम पाटील यांच्या कवितेचे स्वरुप असे आहे.

*तळहात, विसावा, कुंकू लालजर्द झालं* यासारख्या त्यांच्या कविता ग्रामीण वास्तव जीवन चितारताना दिसतात. त्यातल्या त्यात स्त्रियांचे भावविश्व रेखाटताना पाटील दिसतात. पण त्यांच्या एकूण कवितेचे स्वरुप पाहता त्यांच्यावर शृंगाराचा प्रभाव अधिक दिसतो. त्यामुळे, साहजिकच त्यांची कविता वास्तवतेपासून दूर गेलेली दिसते.

एकनाथ देशमुख यांचा *ओळखी अनोळखी* हा काव्यसंग्रह इ.स. १९७२ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांनी या काव्यसंग्रहात सकाळ, दुपार, सांज आणि रात असे विभाग केलेले आहेत. *सकाळ* या विभागात निसर्गाचे सौंदर्यवर्णन करणाऱ्या कविता आहेत. निसर्ग प्रतिमांचा वापर येथे स्त्री पुरुष रुपांसाठी केलेला दिसतो. उदा. क्र.२ या कवितेतील बाळंत होण्याऱ्या रानातल्या बोरी, त्यांच्या हळदी उन्हात न्हालेल्या पोरी, पानापानात लपताना अंगावर उठलेले काटे भन्नाटलेल्या वाऱ्याच्या डोळ्यात हसणे, बेफाम होऊन तिच्या गालाचे मुके घेणारा पोपट इ. येथे निसर्ग प्रतिमा येतात. अशा अनेक कवितातून निसर्ग प्रतिमा स्त्री पुरुष रूप धारण करताना दिसतात. त्यांच्या या कविता महानोरी थाटाच्या आहेत. परंतु महानोरांच्या कवितेत जो निर्भरपणा दिसून येतो तो देशमुखांच्या कवितेत दिसून येत नाही. त्यांनी आपल्या सर्व कवितेसाठी प्रमाण भाषेचा वापर करून घेतलेला दिसतो. त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेत ग्रमीण वस्तवतेचे चित्रणही कमी प्रमाणात दिसते. खरे तर प्रतिमांचा योग्य वापर करण्याची ताकद, शब्दांवर हुकुमत व ग्रमीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव हे सर्व पाठीशी असतानाही देश्मुख ग्रामीण कविता लिहू शकले नाहीत. याला कारण त्यांच्यावर असणारा सौंदर्यवादी कवितेचा व नवकवितेचा प्रभाव या प्रभावाखाली देशमुख यांनी स्वत:ला वाहून टाकले व खरे ग्रामीण जीवन चितारायचे ते विसरून गेले.

चंद्रास्त हे प्र.श्रा.चौधरी यांचे खंडकाव्य ग्रामीण जीवनाचा चोहू बाजूने वेध घेणारे असे हे खंड्काव्य आहे. या खंड्काव्यात अनेक पात्रे येतात. बंडू महाजन, बहिरी बोहारीण, आंधळी सरी, तिचा नवराठगी, धोंडू शेठ, त्याचा मुलगा अरूण त्याचप्रमाणे शंकर पाटील व त्याची पत्नी राधा ही मुख्य पात्रे ही येतात. सर्व जण दारिद्रयाने गांजलेली, परिस्थिती बळी पडली तर कोणी कोणाच्यातरी वासनेची शिकार झालेली. या सर्वांच्या कारूण्यपूर्ण जीवनाची ही कथा आहे. सर्वजण चांगलं जीवन जगण्याचा प्रयत्न करतात पण आहे या परिस्थितीत त्यांना आपला प्राण सोडावा लागतो. साधी सरळ भाषा, पात्रांच्या तोंडी बोलीतील वाक्ये अशा प्रकारे हे खंडकाव्य साकार होते. ग्रामीण जीवनातील तळागाळातील लोकांचे दारिद्रय या खंडकाव्यात रेखाटण्याचा प्रयत्न येथे कवीने केला आहे. तो बहुतांशी प्रमाणात यशस्वी झाला आहे.

सारांश: इ.स. १९८०. पर्यंतच्या कृषिजीवनविषयक कवितांचे स्वरूप अशा प्रकारे आहे. म. फुलेंच्यापासून या कृषिजनविषयक कवितेला सुरूवात झाली. ती कविता वेगवेगळी वळणे घेत पुढे प्रवाहीपणे वाहू लागली. महात्मा फुल्यांनी शेतकरी लोकांच्या समस्या चव्हाट्यावर मांडल्या. त्यांच्या अन्यायाला वाचा फोडली. पण त्यांची कवितेतील वास्तवता पुढे दीर्घकाळ चालली नाही. त्यानंतरच्या काळात जी कृषिजन विषयक कविता लिहिली गेली ज्याला त्याकाळात व नंतरही जानपद कविता म्हणून

ओळखले जाते ती कविता ग्रामीण जीवनाचे वास्तव रेखाटण्यामध्ये अयशस्वी ठरली. उलट तिने एक रुचिपालट व खेड्याचे आकर्षण या पोटीच ग्रामीण जीवनाकडे पाहिले. त्यांच्या कवितेत चित्रित झालेले कृषिजन जीवन सुंदर, सुखी,समाधानी असेच राहिले. त्यामध्ये भा.रा.तांबे, सर्व रविकिरण मंडळातील कवी तसेच, चंद्रशेखर सारख्या कवींचा समावेश होतो.

रविकिरण मंडळाच्या या कार्याबद्दल केशव सद्रे म्हणतात - 'चळवळीच्या स्वरुपात वाङ्मयीन कार्य करूनही हे काव्य समकालीन जीवन जाणीवांना व्यक्त करण्याच्या दृष्टीने अपयशी ठरले.'[४२]

जानपद कवितांचा संग्रह *सुगी* हा ग.ल.ठोकळांनी संग्रहित केला व प्रसिद्ध केला. या संग्रहाने कृषिजन विषयक कवितांना चालना दिली. या संग्रहातील अनेक कवींनी पुढे आणखी काव्य लेखन केलेले दिसते. परंतु, या सुगीवर सौंदर्यवादाचाच प्रभाव दिसून येतो. विशेष म्हणजे ग.ह. पाटील सारखे काही कवी ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले होते. तरीही त्यांनी कृषिजन जीवन वास्तवपणे रेखाटले नाही. यातील काही कवींना तर कृषिजीवनाचा अनुभवच नव्हता त्यामुळे त्यांनी आपल्या कवितेत अनेक घोटाळे केलेले दिसतात. याच काळात काव्यलेखन करणारे व ज्यांची *सुगी*तही कविता होती असे पां.श्रा.गोरे यांची कविता मात्र वास्तव कृषिजीवन रेखाटताना दिसते. याचकाळात, कवी गिरीश व चंद्रशेखर यांनी कृषिजीवनावर खंडकाव्येही लिहिली. अर्थात, या सर्व कवितांवर रोमँटिक वृत्तीचाच प्रभाव दिसून येतो. हा प्रभाव पुढे दीर्घ काळ चालला त्यामुळे, खरे कृषिजन जीवन कवितेमध्ये चित्रित होण्यास बहिणाबाईंच्या कवितेपर्यंत रसिकांना वाट पहावी लागली. बहिणाबाईंचे पुत्र सोपानदेव चौधरीही कवी होते. त्यांची कविता बहिणाबाईंच्या पूर्वी प्रसिद्ध झाली परंतु, तेही वास्तव कृषिजन जीवन रेखाटण्यात अपयशी ठरले. बहिणाबाई मात्र लोकपरंपरेचा वसा पाठीशी घेऊन काव्यलेखन करताना दिसतात. कृषिजन जीवनाचे सूक्ष्म अवलोकन त्यांच्या कवितेत दिसते. ही कविता स्त्री सुलभ प्रवृत्तीने लिहिलेली दिसते. सर्वसामान्यांच्या मध्ये लोकप्रियताही या कवितेला लाभली. त्यानंतरच्या काळात आनंद यादवांनी काव्यलेखन केलेले दिसते. प्रत्यक्ष शेतामध्ये राबलेला हा गृहस्थ पूर्व(कृषिजन)कवितेने अस्वस्थ झालेला होता. त्यांनी आपण अनुभवलेले जीवन प्रभावीपणे चित्रित केले. ग्रामीण माणसाला बोलतं करून त्यांनी मराठी कवितेला वेगळे वळण लावले. इ.स.१९६० नंतरच्या काळात कृषिजन कवितेमध्ये आणखी एक प्रभावी कवी प्रकट झाला तो म्हणजे ना.धों.महानोर. प्रत्यक्ष शेतामध्ये राबणा-या या कवीच्या कवितेत सर्व रानच प्रकट झालेले दिसते. शेताची विविध रुपे त्यांच्या कवितेत वेगवेगळ्या मानवी प्रतिमा साकारताना दिसतात. पुढे दीर्घकाळ या कवीने काय लेखन केले. पुढील काळात रानातील ही कविता गावामध्ये आली.

तेथील भीषण वास्तव हा कवी रेखाटू लागला. कृषिजन कवितेवर या कवीचा विलक्षण प्रभाव दीर्घकाळ राहिला. निसर्गाचा वेगळा अविष्कार त्यांच्या कवितेत प्रकट झाला.

इ.स.१९८० पूर्वी पर्यंतच्या कवितेने अशा प्रकारे वेगवेगळी वळणे घेतलेली दिसतात. कृत्रिम कृषिजन जीवन रेखाटणारी ही कविता पुढे वास्तवतेकडे झुकू लागली व पुढे खरे कृषिजीवन आपल्या कवितेमध्ये रेखाटू लागली. या काळात तिची अभिव्यक्ती ही वेगवेगळ्या पद्धतीने प्रकट झाली. कधी निसर्ग प्रतिमातून ती बोलू लागली. तर कधी नागरी शब्द योजना करू लागली. कधी शब्दांची मोडतोड करून ग्रामीण भाषा तयार करताना अनेकजण दिसतात तर कधी नागरी भाषेतून खरे कृषिजन अनुभव रेखाटतानाही काहीजण दिसतात. शेत, शेतकरी, शेतमजूर गावगाड्याचे चित्रण करताना ही कविता वेगवेगळी वळणे घेताना दिसते. या काळातील महत्वाचे कवी म्हणून महात्मा फुले, बहिणाबाई चौधरी, ना.धों.महानोर यांचा उल्लेख करावा लागतो.

## प्रकरण एक

## संदर्भ


१. आनंद यादव, ग्रामसंस्कृती : दशा आणि दिशा, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, २०००, पहिली आवृत्ती, पृष्ठ - ३२

२. वा.ल.कुलकर्णी, मराठी कविता जुनी आणि नवी मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८०, पहिली आवृत्ती, पृष्ठ - २०५

३. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३, तृतीय आवृत्ती, पृष्ठ - ६

४. नागनाथ कोतापल्ले, महात्मा फुले गौरव ग्रंथ(संपा.पी.बी.साळुंखे) मुंबई,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, १९८२, आवृत्ती नाही, पृष्ठ - ५२६

५. महात्मा फुले, अखंड, महात्मा फुले गौरव ग्रंथ उ.नि.पृष्ठ - ५२९

६. महात्मा फुले, महात्मा फुले गौरव ग्रंथ, उ.नि., पृष्ठ - ५२१

७. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, उ.नि. पृष्ठ - ४

८. तत्रैव, पृष्ठ - ४०

९. कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९९, प्रथम आवृत्ती, पृष्ठ - २४.

१०. पां.श्रा.गोरे, बोबडे बोल, यवतमाळ, झेड.एन.नादुरकर,१९३२ प्रथम आवृत्ती, पृष्ठ - ३१.

११. तत्रैव - पृष्ठ - ३४

१२. कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, उ.नि., पृष्ठ - ३७

१३. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, उ.नि.,पृष्ठ -४०

१४. राजन गवस, बळिवंत, श्रीकांत देशमुख, परभणी, लोकविद्या प्रकाशन, २००२ दुसरी आवृत्ती, पृष्ठ - ७२

१५. वा.ल.कुलकर्णी, साहित्य शोध आणि बोध, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९६७, पहिली आवृत्ती, पृष्ठ - २०३

१६. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, उ.नि., पृष्ठ - ४२

१७. ग.ल.ठोकळ, मीठभाकर, पुणे, ठोकळ प्रकाशन, १९३८, पृष्ठ - ४६

१८. रविंद्र ठाकूर, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, (संपा, चंद्रकुमार नलगे), पुणे, सुरेश एजन्सी, १९९६ प्रथम आवृत्ती, पृष्ठ - १२१

१९. कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, पृष्ठ - ६५

२०. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, उ.नि., पृष्ठ - ४७
२१. के.नारखेडे, शिवार, पुणे, लेखन वाचन भांडार, १९४१, पृष्ठ - १
२२. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, उ.नि., पृष्ठ - ४५
२३. के.नारखेडे, शिवार,उ.नि., पृष्ठ - ५६
२४. रविंद्र ठाकूर, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, उ.नि., पृष्ठ - १२३
२५. बहिणाबाई चौधरी, बहिणाबाईंची गाणी, (संपा सोपानदेव चौधरी), ज्योति पिरीयॉडिकल्स, १९८२, चौथी आवृत्ती, पृष्ठ - ३
२६. तत्रैव, पृष्ठ -२३
२७. तत्रैव, पृष्ठ - ५६
२८. तत्रैव, पृष्ठ - ५७
२९. तत्रैव, पृष्ठ -२१
३०. तत्रैव, पृष्ठ - २१
३१. तत्रैव, पृष्ठ - १३
३२. आनंद यादव, माळ्याची माती, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९७८,प्रथम आवृत्ती,पृष्ठ - ८
३३. विश्वास जहागीरदार, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-डिसेंबर, १९८०, पृष्ठ - १००
३४. अनुराधा पोतदार, आनंद यादव, व्यक्ती आणि वाङ्मय (संपा रविंद्र ठाकूर), पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३ प्रथम आवृत्ती, पृष्ठ - ५६
३५. ना.धों.महानोर, रानातल्या कविता, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९९२,तिसरी आवृत्ती, पृष्ठ -९
३६. तत्रैव, पृष्ठ -२४
३७. ना.धों.महानोर, वही, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९७१, प्रथम आवृत्ती, पृष्ठ - १४
३८. ना.धों.महानोर, पावसाळी कविता, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८२,प्रथम आवृत्ती, पृष्ठ - ३२
३९. या.ल.कुलकर्णी, प्रदक्षिणा, (संपा अ.अ.कुलकर्णी), पुणे, कॉंटिनेंटल प्रकाशन, १९९१, प्रथम आवृत्ती, पृष्ठ - ३९
४०. राजन गवस, बळिवंत, उ.नि., पृष्ठ -७३
४१. म.सु.पाटील, कवितेचा रुपशोध, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, १९९९, पहिली आवृत्ती, पृष्ठ-११५
४२. केशव सद्रे, कवितेतील आधुनिक वाद, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन,२०००, पहिली आवृत्ती, पृष्ठ - ४२